मंगळवार, २७ डिसेंबर २०२२
वर्ष १५ ◆ अंक १५९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

फडके नाट्यगृहात मराठी नाटकांना भाडे सवलत/३
कामगारांच्या प्रश्नावर शासन सकारात्मक -आमदार नाईक/६
जम्पिंग शो घोडेस्वारी स्पर्धेत माथेरानच्या किरणचे यश/८

## पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर भारताचे 'प्रलय'



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर 'प्रलय' हे क्षेपणास्त्र तैनात करण्यात येणार आहे. भारतीय संरक्षण मंत्रालयाने १२० प्रलय क्षेपणास्त्रांच्या खरेदीला परवानगी दिली आहे. त्यामुळे भारताचे शत्रू मानले जाणारे चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना भारताकडे वाईट नजरेने पाहण्याचे धाडस होणार नाही. प्रलय हे कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वेग सर्वाधिक मारक आहे. वांगमध्ये चिनी सैन्यासोबत भारतीय सैनिकांच्या हिंसक चकमकीच्या पार्श्वभूमीवर भारताला सीमा सुरक्षेच्या दृष्टीकोनातून प्रलय हे शक्तिशाली बॅलेस्टिक क्षेपणास्त्र तैनात करण्यात येणार आहे.

# सीमाप्रश्नाबाबत विधिमंडळात आज कर्नाटकविरोधी ठराव

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

कर्नाटक-महाराष्ट्र सीमाप्रश्नावरून सुरू असलेल्या वादाचे पडसाद नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनातही उमटत आहेत. आता महाराष्ट्राच्या विधिमंडळातही सिमाप्रश्नाबाबत कर्नाटकविरोधी ठराव मांडण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २६) सांगितले आहे. हा ठराव मंगळवारी विधिमंडळात मंजूर केला जाईल.

यापूर्वी कर्नाटकने सिमाप्रश्नाबाबत महाराष्ट्रविरोधी




ठराव त्यांच्या विधीमंडळात मांडला होता. त्यावर महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा मुद्दा सोमवारी आपल्या विधानसभेत उपस्थित करण्यात आला. राज्य सरकारने अद्यापही कर्नाटक सरकारविरोधात ठराव मांडला नसल्याबाबत विरोधकांकडून टीका करण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज किंवा उद्या ठराव मांडला जाईल अशी माहिती दिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत म्हणाले की, आपण इंच इंच जागेचा विचार करू. सर्वोच्च न्यायालयात आणि केंद्र सरकारसमोर आपण सीमावर्ती भागातील नागरिकांवरील अन्याय दूर करण्यासाठी जे करायचे असेल ते करू. आज तो ठराव आपण मांडला होता.

> **सुप्रीम कोर्टात हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करीत कायदा व सुवस्थेचा प्रश्न होऊ नये, अशा सूचना केल्या आहेत. असे असताना कोर्टातील प्रकरणावर परिणाम होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. आम्ही सीमावासियांसाठी खंबीर आहोत.**
>
> **–एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री आज दिल्लीला केंद्राच्या कार्यक्रमासाठी गेले. त्यामुळे ते आज जर आले तर आज किंवा उद्या हा ठराव आपण मांडू. यासंदर्भात आपण तसूभरही मागे हटणार नाहीत. या मुख्यमंत्र्याला, उपमुख्यमंत्र्याला मान खाली घालायला लावेल अशी कोणाच्या बापाची हिंमत नाही. असे स्पष्ट करून ते म्हणाले की, केंद्रात, सर्वोच्च न्यायालयात आपण मराठी बांधवांवरील अन्याय दूर करण्यासाठी हवे ते करु, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## वाढीव वीजदेयके आणि इतर प्रश्नांवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले लक्ष

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात वीज ग्राहकांना महावितरणकडून वाढीव देयके आणि इतर प्रश्नांबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे आवाज उठविला.

या वेळी, वीज ग्राहकांना देण्यात आलेली देयके दुरुस्त करण्यात येत असल्याचे शासनाने उत्तरात म्हटले होते. त्या अनुषंगाने या उत्तरावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात म्हटले की, आज पनवेल परिसराची लोकसंख्या प्रचंड प्रमाणामध्ये वाढत असून यामध्ये मध्यमवर्गीय समाज मोठ्या प्रमाणावर आहे. उत्तरात म्हटल्याप्रमाणे २,६२५ देयके दुरुस्त केली गेलेली आहे. मग ज्या ग्राहकांना याचा मनस्ताप झाला त्या नागरिकांचा मनस्ताप वाढवणाऱ्या अधिकाऱ्यांवर वीज वितरण कंपनी किंवा शासन काय कारवाई करणार आहे, तसेच कोरोनामुळे अनेक घरांचे बजेट बिघडलेले आहे. अशा वेळी एक महिन्याचे बिल भरले नाही तर ग्राहकांचे मीटर काढून नेले जाते. वीजपुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे या अनुषंगाने हा कालावधी एक महिन्याऐवजी दोन महिन्यांचा करण्यासंदर्भामध्ये शासन निर्देश देईल का? त्याचबरोबर पनवेल विभाग आता भांडुप विभागाच्या अंतर्गत येतो आणि या भांडुप विभागामधल्या वीज वितरणाचे खासगीकरण करण्यासंदर्भात शासनाने हरकती, सूचना मागवल्यात आणि त्याला सगळ्या पद्धतीच्या ग्राहकांचा विरोध आहे आणि म्हणून शासनाची कंपनी जर सेवेचे उत्तरदायित्व स्वीकारत नाही अशी लोकांची भावना आहे, तर खासगी कंपनी कोणाला जुमानेल आणि त्यामुळे या निर्णयाचा शासन फेरविचार करेल काय? असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून केले.

या वेळी लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना




राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, वीज मीटरचा फोटो तपासणी करताना अस्पष्ट फोटोंचा प्रमाण संपूर्ण महाराष्ट्रात जानेवारी २०२२मध्ये ४५.६ टक्के होते आणि ते आता प्रमाण आपण कमी करून नोव्हेंबर २०२२मध्ये १.९ टक्केपर्यंत आले आहे आणि त्यासोबत राज्यामध्ये सरासरीनुसार देयकांचे प्रमाण जुलै २०२२मध्ये ७.३ टक्के होते ते आता आपण ५.७ टक्क्यांपर्यंत कमी आणले आणि ते आपण अजून कमी करण्यासंदर्भात प्रयत्नशील आहोत.

पनवेल तालुक्याचा विचार केला, तर साधारणपणे फेब्रुवारी २०२२पर्यंत अस्पष्ट फोटोंचे प्रमाण हे १२ टक्के होते ते आता १.३ टक्क्यांपर्यंत आपण कमी आणलेले आहे आणि त्यासोबत या ठिकाणी सरासरी देयके आहेत, ४,४०९ देयके आहेत. ती ०.२६ टक्के आहेत आणि त्रुटी आढळलेले जे काही देयके आहेत ते आता ०.१६ टक्के राहिलेली आहे. त्यामुळे याच्यामध्ये गुणात्मक सुधारणा आता या ठिकाणी केली वीज महावितरणने केली आहे.

जे काही चुकीचे मीटर फोटो काढतात किंवा फोटो काढतच नाही आणि मग ते पाठवून देतात अशा ग्राहकांकडून पनवेलच्या या सगळ्या परिसरामध्ये आपण आत्तापर्यंत त्यांना ६.६० लाख रुपये एवढा दंड आकारला आहे आणि मोठ्या प्रमाणात म्हणजे महाराष्ट्रामध्ये मीटर रिडींगच्या ७६ एजन्सींना बडतर्फ केले आहे. **(पान २ वर...)**

## आयटीआयमधील विद्यार्थ्यांच्या मासिक विद्यावेतनात लवकरच भरघोस वाढ

**नागपूर : प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील ४१८ शासकीय आयटीआयच्या नूतनीकरणासाठी १२०० कोटींच्या प्रस्तावाची मागणी केली आहे. ज्याची अंमलबजावणी पुढील सहा महिन्यापर्यंत पूर्ण केली जाईल, तसेच विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्यात येईल, असे आश्वासन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विधानपरिषदेत दिले.

राज्यातील हजारो विद्यार्थी आयटीआमध्ये शिक्षण घेत असतात. या मुलांना विद्यावेतन म्हणून १९८६ पासून मासिक ४० रुपये देण्यात येत आहेत. या विद्यावेतनात ५०० रुपयांपर्यंत वाढीचा प्रस्ताव असून येत्या तीन महिन्यात मंत्रिमंडळ बैठकीत याला मंजुरी मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. त्याचसोबत आयटीआयमध्ये नवीन कोर्स समाविष्य करण्याबाबत पुढील वर्षी घोषणा करू, असेही मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

राज्यातील ३६ जिल्ह्यांसाठी एका कमिटीची स्थापना करून त्या जिल्ह्यात ज्या कंपन्या आहेत, तिथे आवश्यक असणारे स्किलसाठीचे कोर्स घेतले जातील आणि त्यारितीने मुलांना प्रशिक्षण दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

## 'विरोधकांनी माहिती घेऊन टीका करावी'

**नवी दिल्ली** : शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी दिल्लीला गेलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. एकनाथ शिंदे नवस फेडण्यासाठी दिल्लीवाऱ्या करतात या ठाकरेंच्या टीकेला आता मुख्यमंत्र्यांनी प्रत्युत्तर दिले. माझ्या दिल्ली दौऱ्यावर टीका करणाऱ्यांनी आधी मी कोणत्या कार्यक्रमाला चाललो आहे, याची माहिती घेतली पाहिजे होती, असे मत मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले. ते सोमवारी (दि. २६ ) लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटल्यानंतर माध्यमांशी बोलत होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, माझ्यावर कोण टीका करतेय? आज दिल्लीत वीर बाल दिवस होता. गुरुगोविंद सिंगांच्या सहा आणि नऊ वर्षांच्या दोन मुलांचे बलिदान झाले. त्यांचा सन्मान म्हणून केंद्र सरकारने २६ डिसेंबरला वीर बालदिवस साजरा केला. केंद्र सरकारच्या या कार्यक्रमाला बोलावले होते. खरे म्हणजे माझ्या दिल्ली दौऱ्यावर बोलणारांनी आधी माहिती घेतली पाहिजे होती की, मी दिल्लीला कुठल्या कार्यक्रमाला चाललो आहे. **(पान २ वर...)**

## निवडक

### 'व्हिडीओकॉन'चे प्रमुख वेणुगोपाल धूत यांना अटक

**मुंबई** : आयसीआयसीआय बँक लोन घोटाळा प्रकरणी व्हिडीओकॉनचे प्रमुख वेणुगोपाल धूत यांना सीबीआयने सोमवारी (दि. २६)अटक केली आहे. मुंबईतील निवासस्थानाहून सीबीआयने अटक केली. वेणुगोपाल धूत यांच्यासह कोचर दांपत्याला तीन दिवसांची सीबीआय कस्टडी सुनावण्यात आली असून गुरुवार (दि. २९)पर्यंत तिन्ही आरोपींना ताब्यात ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

### विद्यार्थ्यांच्या रूममध्ये सिलिंडरचा स्फोट

**नाशिक** : येथील कॅनडा कॉर्नरजवळ असलेल्या अपार्टमेंटमध्ये मध्यरात्री पावणेदोनच्या सुमारास आगीचा भडका उडाला. क्षणार्धात संपूर्ण फ्लॅट आगीच्या भक्षस्थानी सापडला. सुदैवाने रूममधील विद्यार्थी जागे असल्याने तत्काळ ते घराबाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला. या वेळी सिलिंडरचा स्फोट होऊन स्लॅब कोसळल्याने फायरमन विजय नागपूरे हे जखमी झाले.


## केंद्रीय आरोग्य मंत्रालय आज घेणार सुविधांचा आढावा

### परदेशांतील वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विशेष मोहीम

**मुंबई : प्रतिनिधी**

चीन, जपान, अमेरिका, ब्राझील या देशांमध्ये कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व रुग्णालये, कोरोना समर्पित रुग्णालये, आरोग्य सुविधा यांच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (दि. २७) विशेष मोहिमेचे आयोजन करण्याचे आदेश केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिले आहेत.

या मोहिमेदरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आरोग्य सुविधांचा विचार करण्यात येणार आहे. यामध्ये रुग्णालयांमधील खाटांची क्षमता, विलगीकरणासाठी उपलब्ध खाटा, प्राणवायूची सुविधा असलेल्या खाटा, अतिदक्षता विभागातील खाटा, जीवन रक्षक प्रणाली असलेल्या खाटा, डॉक्टर, परिचारिका, निम्न वैद्यकिय, आयुष डॉक्टर, आशा, अंगणवाडी



सेविका, कोरोना व्यवस्थापनावर व्यावसायिक प्रशिक्षित आरोग्य सेवा, शस्त्रक्रियेसाठी प्रशिक्षित आरोग्य सेवा कर्मचारी, जीवनरक्षक प्रणाली वापरण्यासाठी प्रशिक्षित असलेले कर्मचारी यासह इतर कर्मचाऱ्यांची उपलब्धता तपासण्यात येणार आहे.

प्रगत आणि मूलभूत जीवन समर्थन रुग्णवाहिकांची उपलब्धता, इतर रुग्णवाहिकांची उपलब्धता, रुग्णवाहिका कॉल सेंटरची उपलब्धता, करोना चाचणी प्रयोगशाळांची संख्या आणि क्षमता, आरटी-पीसीआर आणि आरएटी किट, चाचणी उपकरणे आणि आवश्यक औषधे, जीवन रक्षक प्रणाली आदींची उपलब्धता, पीपीई किट, एन-९५ मुखपट्टी, प्राणवायू सिलिंडर, कॉन्सन्ट्रेटर्स, द्रवरूप वैद्यकिय प्राणवायू साठवण व्यवस्था, वैद्यकीय गॅसवाहिनी प्रणाली, टेलिमेडिसिन सेवांची उपलब्धताही यावेळी तपासण्यात येणार आहे.

ही विशेष मोहीम आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. या मोहिमेनुसार आरोग्य सुविधांच्या तयारीच्या स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी कोविड इंडिया पोर्टलवर ऑनलाईन अर्ज देण्यात आला आहे.

## चॉकलेटने घेतला चिमुकलीचा जीव

**सातारा** : साताऱ्यात एक वर्षाच्या चिमुकलीचा चॉकलेट घशात अडकून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी (दि. २५) रात्री घडली. आईने मुलीला रुग्णालयात नेले, पण त्याआधीच मुलीचा मृत्यू झाला होता. मृत्यू झालेल्या मुलीचे नाव शर्वरी सुधीर जाधव असे आहे.

शर्वरीला शेजारी राहणाऱ्या मुलीने जेली चॉकलेट खायला दिले होते. शर्वरीने चॉकलेट गिळल्यानंतर ते घशात अडकले. यानंतर काही वेळातच शर्वरी बेशुद्ध झाली. जेव्हा आईच्या लक्षात आले तेव्हा शर्वरीला शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तिची तपासणी केली, पण उपचाराआधीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड पोलिसांची फौज तैनात

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येने पर्यटक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रायगड पोलीस सज्ज झाले आहेत. जिल्ह्यात पोलीस बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली आहे. वाहतूक नियंत्रणासाठी ८६ ठिकाणी ९० वाहतूक पोलीस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत.

अतिउत्साही पर्यटकांवर, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे. सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलिसांच्या तीन स्पीड बोटी रात्रंदिवस गस्त घालणार आहेत.

पर्यटकांच्या सुरक्षेसाठी



जिल्ह्यातील प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवर तात्पुरत्या पोलीस चौक्या उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी २४ तास पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. बीट मार्शल्स, दामिनी पथक, साध्या गणवेषातील कर्मचाऱ्यांसह, सशस्त्र पोलीस बंदोबस्त किनाऱ्यांवर ठेवला जाणार आहे. ७६ अधिकारी ४१२ पोलीस अंमलदार तैनात केल्या जाणार आहेत. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याकडे विशेष पथके तयार करण्यात आले आहेत. **(सविस्तर वृत्त ५ वर...)**

## रेवदंड्याच्या आगरकोटला गतवैभव मिळणार!

### केंद्रीय पुरातत्व विभागाकडून प्रवेशद्वाराची डागडुजी



(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

केंद्रीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या पुढाकाराने रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या (चौकोनी बुरूज) डागडुजीचे काम सुरू झाल्याने इतिहासप्रेमींनी समाधान व्यक्त केले.

रेवदंडा आगरकोट किल्ला ढासळत असल्याने याकडे इतिहासप्रेमींनी अनेक वेळा केंद्रीय पुरातत्व खात्याचे लक्ष वेधले होते. अखेर केंद्रीय पुरातत्व विभागाच्या वतीने रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या (चौकोनी बुरूज) दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे.

आगरकोट किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या डागडुजी, तटबंदीची दुरुस्ती, मोडकळीस आलेल्या पायऱ्यांची दुरुस्ती आदी कामे केंद्रीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या वतीने करण्यात येणार आहेत. अलिबागचे सर्वेक्षण सहाय्यक बजरंग ऐलीकर यांचे मार्गदर्शनाखाली डागडुजीचे काम केंद्रीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे माध्यमातून करण्यात येत आहे.

**किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व**

**पोर्तुगिज कप्तान सोज यांनी सन १५२८मध्ये आगरकोट किल्ला बांधला, परंतु त्याआधी सन १५१६मध्ये कारखान्यासाठी इमारत बांधली तिला चौकोनी बुरूज म्हणतात. या चौकोनी बुरूजाची तटबंदी १५२१ ते १५२४मध्ये बांधली असा उल्लेख आढळतो.**

## अलिबागमधील शहापूरला उधाणाचा तडाखा

### २२ घरांसह ३०० एकर शेतीला फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील शहापूर येथे सोमवारी (दि. २६) पहाटे ३ वाजता उधाणाचे पाणी घरात शिरल्याची घटना घडली. यामुळे २२ घरांसह ३०० एकर शेतीला या उधाणाचा तडाखा बसला.

सोमवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास शहापूर गावाला उधाणाच्या पाण्याने वेढा दिला. गाढ झोपेत असलेल्या गावकऱ्यांची यामुळे चांगलीच तारांबळ उडाली. २२ घरांमध्ये उधाणाचे पाणी शिरले, तर जवळपास ३०० एकरचा परिसर उधाणाच्या पाण्याने जलमय झाला. त्यामुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.



खारभूमी विभागाच्या उदासिनतेमुळे गावकऱ्यांना सातत्याने या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. ऑगस्ट २०२१मध्ये शहापूर गावालगत असलेल्या खारबंदीस्थीला तडे गेले होते. तेव्हापासून खाडीतील उधाणाचे पाणी लगतच्या परीसरात शिरण्यास सुरुवात झाली होती.

ग्रामस्थांनी वेळोवेळी ही बंदिस्ती दुरुस्त करण्याची मागणी केली होती, पण प्रशासनाने तांत्रिक कारणे पुढे करीत मागणीकडे दुर्लक्ष केले आहे.

खारबंदिस्तीच्या दुरुस्तीसाठी पोहोच रस्ता तयार करणे आवश्यक आहे. या रस्त्यासाठी आवश्यक सामुग्री जेएसडब्लू कंपनीने देण्याची तयारी दाखवली होती. ग्रामस्थांनी रोजगार हमीतून खारबंदीस्तीची दुरुस्ती करण्याची तयारी दाखवली होती, मात्र प्रशासकीय यंत्रणांमध्ये समन्वय नसल्याने वर्षभरानंतरही हे काम सुरू होऊ शकलेले नाही.

दरम्यान उधाणामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा कृषी व खारभूमी यांनी संयुक्तपणे गरजेचे आहे, अशी मागणी आत्माराम गोमा पाटील यांनी केली आहे.

# संजय राऊतांचे मानसिक संतुलन बिघडलेय

## मंत्री शंभूराज देसाई यांची टीका

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर केलेल्या टीकेला प्रत्त्युतर दिले आहे. तीन-साडेतीन महिने आराम केल्यामुळे त्यांचे थोडसे मानसिक संतुलन बिघडलेले आहे, त्यांच्यावर उपचारांची गरज आहे. असे ते म्हणाले आहेत.

संजय राऊतांनी केलेल्या टीकेवर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना शंभूराज देसाई म्हणाले, रोज नवा मुद्दा काढला जातो, सुरुवात एका मुद्द्यावर करतात, भरकटत तिसरीकडे जातात. त्यामुळे मला असे वाटतेय तीन-साडेतीन महिने आराम केल्यामुळे त्यांचे थोडे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. त्यांच्यावर उपाचाराची गरज आहे, जेणेकडून अशाप्रकारे बेताल बडबड करण्याचे राऊत थांबवतील. प्रसारमाध्यमच त्यांना महत्त्व देतात, आम्ही त्यांच्या बेताल वक्तव्यांना महत्त्व देत नाहीत.

याशिवाय, मुख्यमंत्र्यांचा दिल्ली दौरा हा पूर्वनियोजित होता. महत्त्वाच्या शासकीय बैठकीसाठी मुख्यमंत्री दिल्लीला जात आहेत. दुपारपर्यंत ते परत येणार आहेत, परंतु शुक्रवारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाचा ठराव, विधानसभेत आणला जाणार होता, परंतु आमदार मुक्ता टिळक यांचे निधन झाले, तो पुढे ढकलावा लागला. कर्नाटकाच्या ठरावापेक्षा १०० पटीने जास्त मजूबत, ज्यामध्ये महाराष्ट्राची भक्कम बाजू असेल, असा प्रस्ताव आज पूर्ण ताकदीनिशी आम्ही दोन्ही सभागृहात आणणार आहोत, असेही मंत्री शंभूराज देसाईंनी सांगितले.



### दोषींविरोधात कारवाई केली जाईल

**तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणावर बोलताना मंत्री शंभूराज देसाईंनी म्हणाले, कोणत्याही मुलीची किंवा मुलाची जातीय रंग देऊन हत्या होत असेल किंवा कोणाला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त केले जात असेल, तर महाराष्ट्रात हे योग्य नाही. ज्या तुनिषा शर्मा केसचा आपण उल्लेख करीत आहोत, त्याबाबत पोलिसांशी चर्चा झाली नाही, परंतु मी नक्कीच यासंदर्भात पोलीस आयुक्तांशी चर्चा करेन. सर्व बाजूने याप्रकरणाची चौकशी व्हावी आणि जे कोणी यामध्ये दोषी असतील त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल.**

# खालापुरातील देवदूतांमुळे आंध्र प्रदेशच्या तरुणीची घरवापसी

**खोपोली : प्रतिनिधी**

आंध्र प्रदेशातून महाराष्ट्रात भरकटत आलेल्या २१ वर्षीय मनीरत्नम किताप्पा या तरुणीची खालापुरातील देवदूतांमुळे सुखरूप घर वापसी झाली आहे.

२० डिसेंबर रोजी जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर एक तरुणी हाळ गावाचे हद्दीत रडत असल्याचे अपघातग्रस्त मदत पथकाचे सदस्य हानिफ कर्जीकर यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी तिची विचारपूस करत तिच्या खाण्या-पिण्याची सोय केली. अपघातग्रस्त मदत पथकाचे गुरुनाथ साठेलकर यांनी तातडीने याबाबत खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्याशी संपर्क साधून या तरुणीबाबत माहिती दिली. तरुणीच्या बोलण्यातून आंध्र प्रदेशची रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर तिची भाषा समजणाऱ्या व्यक्तीला पाचरण करण्यात आले. त्यानंतर तरुणीने सांगितलेल्या त्रोटक माहितीच्या आधारे आंध्र प्रदेशातील येल्लूर या ठिकाणी संपर्क साधण्यात आला. ही तरुणी महिन्याभरापासून बेपत्ता असल्याची तक्रार तेथील स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद असल्याची माहिती मिळाली. तरुणीला नेण्यासाठी आंध्र प्रदेशातून पोलीस कर्मचारी महाराष्ट्र रायगडकडे रवाना झाले होते. तोपर्यंत तरुणीची व्यवस्था कर्जत दहिवली येथील मुलींच्या आश्रमात करण्यात आली होती.



शनिवारी आंध्रप्रदेश येथून अधिकारी आणि महिला पोलीस कर्मचारी खालापूर येथे आल्यानंतर कायदेशीर सोपस्कार पार पाडत तरुणीला आंध्र प्रदेश पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. शनिवारी रात्रीच्या ट्रेनने तरुणी आंध्र प्रदेश येथे रवाना झाले.

# पोलादपूरात वृद्ध व्यक्तीचा दरीत कोसळून मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे खुर्द येथील एक वृद्ध नेत्रतपासणी शिबिरासाठी पोलादपूर शहरामध्ये आला असताना घरी वेळेवर न पोहोचल्याने शोधाशोध केली असता दरीमध्ये जखमी अवस्थेत आढळून आला.

याला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये प्राथमिक उपचारानंतर मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असताना मयत झाल्याची माहिती पोलादपूर पोलिसांना कळविण्यात आल्यानुसार याप्रकरणी अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर २३-२०२२नुसार नोंद केल्याची माहिती तपासिक अंमलदार संदीप शिरगांवकर यांनी दिली आहे.

पोलादपूर शहरात नेत्रतपासणी शिबिरासाठी आलेले रामचंद्र बावळेकर (वय ६५, मु. पो. कापडे खुर्द) हा डोळे तपासणीनंतर घरी परत गेला तरीही घरामध्ये रात्री ९ वाजेपर्यंत न आल्याने त्याची आई आणि चुलते गंगाराम बावळेकर यांनी त्यांचा शोध घेतला असताना पोलादपूरच्या दिशेने वाटेवर त्यांची एक चप्पल आणि टॉवेल आढळून आला. म्हणून त्यांचा शोध घेतल्यानंतर दरीमध्ये टेकडीच्या पायथ्याशी जखमी अवस्थेत आढळले. त्यांच्या डोक्याला आणि पोटाला मार लागल्याने त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथून त्यांना जे. जे. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# नवनिर्वाचित सरपंचांचा आमदार दळवींच्या हस्ते सत्कार



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड वावडुंगी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक नुकतीच झाली असून या निवडणुकीत बाळासाहेबांची शिवसेनेकडून घवघवीत यश संपादन करून विजयी झालेल्या ऋतुजा दिपेश वरणकर यांना सरपंच होण्याचा बहुमान मिळविला. याबद्दल अलिबाग-मुरूड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते नवनिर्वाचीत सरपंच ऋतुजा वरणकर यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी जिल्हा महिला संघटिका शुभांगी करडे, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, माजी सरपंच हरिचंद्र भेकरे, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, युवा प्रमुख दिपेश वरणकर, ग्रामपंचायत सदस्या निलम भुवड, गौतमी मोरे, सुवर्णा भुवड, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उपतालुका प्रमुख मनोज कमाने, अविनाश शिंदे, विकास मोरे, सुनील दिवेकर, नितीन भुवड, सखाराम भेकरे, संदिप महाडिक, प्रदीप वाजे, अशोक महाडिक, मंगेश मोरे आदी उपस्थित होते.

सरपंच ऋतुजा दीपेश वरणकर म्हणाल्या की म्हालोर, वरची वाडी वावडुंगी, वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांनी माझ्यावर जो विश्वास ठेवून मला भरघोस मतदान करून मला निवडून दिलात त्याबद्दल सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले आहेत. त्याबरोबर अलिबाग-मुरूड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या आशीर्वादाने मी आज सरपंचपदी बसले आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी वावडुंगी ग्रामपंचायतीकरिता आणून महालोर, वरची वावडुंगी, सायगाव व वावडुंगी या गावाचा विकास करणार असल्याचे सांगितले.

आगामी काळात गावात जास्तीत-जास्त विकासकामे करण्यासाठी भरघोस निधी वावडुंगी ग्रामपंचायतीकरिता उपलब्ध करून देण्याची ग्वाही या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी दिली आहे.

# आमदार गोगावलेंबाबत अपमानास्पद संभाषणप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाडचे आमदार भरत गोगावले आणि त्यांच्या पत्नीबाबत शिव्या देणारे संभाषण संपूर्ण शहरात व्हायरल झाल्यानंतर याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात आमदार गोगावले यांच्या समर्थकाने दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल झाला आहे.

आमदार गोगावले आणि जमीर फैरोजखान देशमुख यांच्यामध्ये फोनद्वारे झालेला संवाद जमीर याने चिथावणीच्या उद्देशाने चंद्रकांत धोंडगे यांना पाठवला. हे संभाषण चंद्रकांत धोंडगे यांनी व्हॉट्सअॅप ग्रुपवर व्हायरल करून आमदार भरत गोगावले आणि पत्नी सुषमा गोगावले यांना अपमानास्पद शब्द वापर केल्याने सिद्धेश मोरे यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

याप्रकरणी चंद्रकांत धोंडगे बेबलघर, जमीर फैरोजखान देशमुख अप्पर तुडील, राज रघुवीर देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost in Lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-27/22-23/ **RFx No. 7000025596** | Providing and fixing of LED light, street light & various sensors at 400 KV Nagothane s/s under 400 KV R.S. O&M Division, Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **1st Ext.** | Rs. 4.29 | 02.01.2023 up to 23:59 Hrs |

**EMD:** Rs. 5,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 e-mail ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**


# शेलू येथे आई भवानी देवीचा यात्रा महोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

शेलू गावाची ग्रामदैवत असलेली आई भवानी मातेचा उत्सव मंगळवार (दि. २७) साजरा होत आहे. हा उत्सव आठ दिवस चालणार असून उत्सव मनोरंजनाचा ठरणार आहे.

सध्या विसावलेल्या शेलू गावाच्या पश्चिम दिशेला असलेल्या माळरानावर आई भवानी मातेचे मंदिर आहे. एका जांभळीच्या झाडाखाली आई भवानी माता विसावली असून ते झाड शतकाहून अधिक जुने आहे. कोणत्याही प्रकारची पशू हत्या त्या ठिकाणी केली जात नसून देवीची ओटी भरणे, पूजा अर्चा करणे तसेच नित्य पुजा शेलू ग्रामस्थ यांच्याकडून केली जात असते. गावातील तरुण कार्यकर्ते समीर मसणे आणि हिसाळगे यांनी एकत्र येत आठ वर्षांपूर्वी देवीचा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.


यावर्षी २७ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत देवीचा यात्रा आहे. आई भवानी जत्रा उत्सव साठी मंदिर आहे. त्या ठिकाणच्या पाच एकर हुन अधिक मोकळ्या जागेत पाळणे आणि झोपले तसेच मनोरंजनचे अनेक खेळ यांची मांडणी करण्याचे काम सुरू आहे. या यात्रा उत्सव काळात शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच सांस्कृतिक सपर्धा यांचे आयोजन करण्यात आले आहे, तर तरुण वर्गासाठी रक्तदान शिबिरदेखील भरवले आहे, तर देवीचा महाभांडारा ३ जानेवारी रोजी आयोजित केला जाणार असून त्या दिवशी सत्कार सोहळा आणि सांस्कृतिक तसेच भजनाचे कार्यक्रमाचे आयोजन आयोजक आई भवानी माता उत्सव मंडळाने केले आहे.

# गोरखनाथ पोळ जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या नैपुण्याने जनमानसात व सामाजिक क्षेत्रात कामाचा ठसा उमटवणारे जीवनदिप एड्युमिडीयाचे रिजनल मॅनेजर गोरखनाथ पोळ यांना अमेझिंग भारत संचलित सोशल अक्टिव्हिस्ट जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे जीवनदिपच्या माध्यमातून योगदान व मानसी सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून केलेले सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. या वेळी आनंद श्री फाऊंडेशनचे सर्वेसर्वा व ओएमजी बुक रेकॉर्ड डिरेक्टर प्रो. दिनेश गुप्ता, एलिजा खान, एंजिला बरवा, संजीव कुमार, सुदर्शन साबत यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. पुरस्काराला उत्तर देताना संस्थेला पुढील कार्यासाठी गोरखनाथ पोळ यांनी शुभेच्छा दिल्या.





**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV(O&M)/ DIVN/MHD/ Tech/Tender-51/2022-23 Dtd. 27.12.2022 **RFx No: 7000025674** | **Sub:** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type (i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at 220 kV Vilebhagad S/s under EHV (O&M) Division, Mahad for the period 01.01.2023 to 31.03.2023. | Rs. 1,48,056/- (including GST) |

**EMD** will be the 1% of the Estimated Cost or 5000/- whichever is the higher & **Tender Fee** will be 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission is from:** 27.12.2022 @ 00:00 Hrs to 02.01.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


पान १ वरून

## वाढीव वीजदेयके आणि इतर प्रश्नांवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले लक्ष

तीन एजन्सींना काळ्या यादीत टाकलेले आहेत. त्यामुळे आता जे बिलिंग आहे त्याच्यामध्ये अतिशय गुणात्मक अशा प्रकारची वाढ ही आपल्याला या ठिकाणी पहायला मिळत आहे. सन २०२०-२१ मध्ये बिलिंगच्या तक्रारी १० लाख २२ हजार होत्या, त्या २०२१-२२मध्ये चार लाख ५८ हजार आणि आता डिसेंबर अखेरपर्यंत दोन लाख ७२ हजारपर्यंत राहिलेल्या आहेत. मीटर रिडर कामात दिरंगाई केल्यामुळे वीज ग्राहकांना त्याचा फटका बसायचा. एमएससीडीसीएलचा मी मनापासून अभिनंदन करेन की, अतिशय चांगले काम यामध्ये कंपनीने केले आहे आणि त्यामुळे वीजदेयक वसुलीदेखील वाढली आहे. अनेक काळापासून फ्रँचाइजी आपण देतो. भिवंडी, मुंब्रामध्ये फ्रँचाईजी दिली आहे कारण फ्रेंचाइजीमध्ये त्यांना आपण काहीही देत नाही, तर या उलट त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात इन्वेस्टमेंट होत आहे, त्या ठिकाणचे प्रश्न सुटत आहेत ज्या ज्या ठिकाणी आपण फ्रँचाईजी दिली आहे. विशेषतः भिवंडी आणि मुंब्र्यामध्ये विजेची उपलब्धता वाढलेली आहे, त्या ठिकाणी लोकांच्या तक्रारी कमी झालेल्या आहेत आणि त्या ठिकाणी कुठलीही तक्रार वीज ग्राहकांची नाही. हे खासगीकरण नसून फ्रँचाइजीचा भाग आहे.

## 'विरोधकांनी माहिती घेऊन टीका करावी'

त्या मुलांनी स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले, परंतु आपला स्वाभिमान जाऊ दिला नाही. अशा शौर्याच्या गाथा निर्माण करणाऱ्या मुलांनी आदर्श घालून दिला.

आज जे केंद्रशासित प्रदेश करा, म्हणत आहेत त्यांनी तर त्यांच्या योजना बंद केल्या. मुख्यमंत्री धर्मादाय निधी बंद केला. महात्मा जोतिबा फुले योजना बंद केली. आम्ही तर ते सुरू केले. आम्ही २००० कोटी रुपयांची म्हैसाळ योजना मंजूर केली. हा एकनाथ शिंदे सीमा आंदोलनात तुरुंगवास भोगलेला व्यक्ती आहे. त्यामुळे त्यावर आम्हाला इतरांनी शिकवण्याची गरज नाही, असे प्रत्युत्तर शिंदेंनी दिले.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ६४ सन २०२२-२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक २७/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०३/०१ /२०२३ रोजी १८.०० वाजे** पर्यंत **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक **०५/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक ०५/०१/२०२३** रोजी **११.००** वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे करजांडी ठाकरकोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५, १२३८ अंतर्गत) | ९७६०७० | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | नांगाव करंजाडी विन्हेरे तुळशीखिंड रस्ता रा. मा. १७२ कि.मी. ८/५०० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ८४१३८१ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | नांगाव करंजाडी विन्हेरे तुळशीखिंड रस्ता रा. मा. १७२ कि.मी. ५/८५० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ८४२१५२ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | नागांव करंजाडी विन्हेरे तुळशीखिंड रस्ता रा. मा. १७२ कि.मी. १३/२०० मध्ये क्रॅश बॅरिअरचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ८४३७०७ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | पोलादपूर वाई सुरुर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. ८/३५० मध्ये पुलावर ऍप्रॉन व नाला ट्रेलिंगचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ७८६१६३ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | पोलादपूर वाई सुरुर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. १/३५० मध्ये पुलावर ऍप्रॉन व नाला ट्रेलिंगचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ७६९६७९ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | पोलादपूर वाई सुरुर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. १८/०० ते २४/२०० वरील दगड व खडक काढणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ७२७८१६ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५३४४**
**दिनांक : २३/१२/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२२-२०२३/२०५**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, जमिन मालकांकडून विकसनास घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - रिस, ता. खालापूर, जि. रायगड**

| भूमापन नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १६४ | ३/ब | ०-४०-७० पो.ख. ०-०८-१० **एकूण ०-४८-८०** | ७.८७ | **भुमी इस्टेट अॅन्ड प्रॉपर्टीजचे भागीदार श्री. भागचंद चुवडमल खुबचंदानी, श्री. मगनभाई नानाभाई पटेल** |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे हातोहात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २६/१२/२०२२.**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ.**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट पनवेल शहर पोलीस स्टेशन जवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

# कोरोना रोखण्यासाठी पनवेल मनपा सज्ज





## नागरिकांना आवाहन

**सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर, गर्दीमध्ये इतरांपासून सुरक्षित अंतर राखणे, सातत्याने हात धुणे , आजारी असल्यास घरी अलगीकरणात रहाणे या प्राथमिक गोष्टीची खबरदारी घेण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.**

**पनवेल : प्रतिनिधी**

चीनसह अनेक देशांमध्ये कोरोनाबाधितांच्या वाढत्या संख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिका प्रशासनाच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने विविध पातळ्यांवरती तयारी करण्यास सुरूवात केली आहे.

कळंबोली येथे कोविड समर्पित रूग्णालय सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत तसेच महापालिका स्वत:ची आरटीपीसीआर लॅब सुरू करणार आहे. आरटीपी-सीआर चाचण्यांमध्येही वाढ करण्यात येणार आहे. या सर्वांसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे नियोजन वैद्यकिय आरोग्य विभागच्या वतीने करण्यात येत आहे.

महापालिकेचे पहिल्या डोसचे १०९ टक्के, दुसऱ्या डोसचे १०२ टक्के तसेच बुस्टर डोसचे १७ टक्के लसीकरण झाले आहे. महापालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोवॅक्सीन लसीकरण सुरू असून ज्या नागरिकांचा लसीकरणाचा दुसरा डोस राहीला आहे, त्यांनी लसीकरण करून घ्यावे तसेच बुस्टर डोसचे लसीकरणही महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. नागरिकांनी बुस्टर डोसचे लसीकरण करून, असे आवाहन करण्यात येत आहे.

# भाजयुमोच्या वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद





## विजेत्यांना पारितोषिक

**भाजयुमोतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक नेहा कदम (पारितोषिक ३००० रुपये व सन्मानचिन्ह), द्वितीय क्रमांक लक्ष्मण कचरे (पारितोषिक २००० रुपये व सन्मानचिन्ह) तर तृतीय क्रमांक दीप्ती पाटील (पारितोषिक १००० रुपये व सन्मानचिन्ह) असे देण्यात आले. दरम्यान, सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह देण्यात आले.**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा यांच्या वतीने भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती दिनानिमित्त रविवारी (दि. २५) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच अभिवादन करून या स्पर्धेला सुरूवात करण्यात आली. १८ ते ३५ वयोगटाच्या व्यक्तींसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून भारतभूमीचे सुपुत्र श्रद्धेय अटलजी, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या डिजिटल इंडियाचा सुशासनावर भर, भारतची ०५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल, फुकटखोरी राजकारणातून विकासाच्या राजकारणाकडे जाणे काळाची गरज, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या सरकारचे युवकांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रीत, अमृतकाल येणारा भारत व युवकांचे योगदान असे स्पर्धेचे विषय होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहामध्ये झालेल्या स्पर्धेला पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, अक्षय सिंग, अजिंक्य भिडे, अनिकेत भोईर, नूतन पाटील तसेच परीक्षक प्राध्यापक बाळासाहेब बडे उपस्थित होते.

## मुरबी येथील स्मशानभूमीत शौचालय बांधण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

मुरबी (खारघर) येथील स्मशानभूमीत शौचालय बांधण्यात यावे, अशी मागणी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. तसेच या निवेदनाची प्रत माहितीसाठी पालिका शहर अभियंत्यांनाही दिली आहे.

खारघर शहरातील माझ्या प्रभागातील मुर्बी गाव सेक्टर १९ या ठिकाणी जी स्मशानभूमी आहे त्या स्मशानभूमीत शौचालयाची कुठलीही सोय नाही. त्यामुळे या ठिकाणी बाहेर गावावरून अंत्यविधीसाठी येणाऱ्या पाहुणे मंडळींची अडचण होते. आज कालच्या धकाधकीच्या जीवनात मधुमेह (डायबिटीस) सारखा आजार असणाऱ्यांना तर ते अधिक अडचणीचे होते. मुरबी गावातील व परिसरातील रहिवाशांनी माझ्याकडे या ठिकाणी शौचालय बांधावे अशी मागणी केलेली आहे. या मागणीची त्वरित दखल घेऊन त्या ठिकाणी लोकांच्या सोयीसाठी त्वरित शौचालय बांधावे, असे नेत्रा पाटील यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे.

## लिमये वाचनालयाचा उद्या अमृत महोत्सवी वर्धापनदिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के. गो. लिमये वाचनालय व ग्रंथालयाच्या अमृत महोत्सवी वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त बुधवारी (दि. २८) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उद्योजक जे. एम. म्हात्रे व कोकण भवन येथील ग्रंथालय संचलनालयाच्या सहाय्यक संचालक शालिनी इंगोले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्लॅटफॉर्म एन्टरटेन्मेंट आणि इंद्रधनु थिएटर्स प्रस्तुत स्वरगंगा हा मराठी व हिंदी गीतांची सदाबहार मैफिल या वेळी आयोजित करण्यात आली असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन के. गो. लिमये वाचनालय व ग्रंथालयाच्या अध्यक्ष अॅड. सुनिता जोशी, उपाध्यक्ष शाम वालावलकर, कोषाध्यक्ष विनायक वत्सराज, सचिव काशिनाथ जाधव तसेच सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वृंदांनी केले आहे.






**खारघर : मथुरा येथील सुप्रसिद्ध भागवताचार्य परमपूज्य देवकीनंदन ठाकूर महाराज यांच्या भागवतकथा कार्यक्रमात भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. यासोबतच त्यांनी भागवतकथा श्रवण करून महाराजांचे आशीर्वाद घेतले. सिडको ग्राउंडवर विश्व शांती सेवा समिती, मुंबई यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, ज्येष्ठ कार्यकर्ते संतोष शर्मा, उत्तर भारतीय सेल सहसंयोजक शैलेन्द्र त्रिपाठी, भागवत कथा आयोजन कमिटी सदस्य आर. के. पांडे, आयोजन कमिटी सदस्य राजेंद्र शर्मा, रमेश गोदरा आदी उपस्थित होते.**

## निवडक

### खारघरमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** खारघर शहरात सेक्टर ८ गुडविल पॅराडाईज बिल्डिंग समोरील रस्त्यावर अनोळखी मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. संबंधित व्यक्तीची ओळख पटली नसून अंदाजे साधारणतः ४५ वर्षांचा हा मृतदेह आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून सहायक पोलीस निरीक्षक विवेक दाभोलकर हे या घटनेचा तपास करीत आहेत.

### अमली पदार्थ सेवनप्रकरणी कारवाई

**पनवेल :** गांजा अमली पदार्थ सेवन केल्या प्रकरणी तळोजा पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात कारवाई केली आहे. तळोजा फेज-२ मेट्रो ब्रिजच्या खाली असलेल्या पान टपरीच्या मागे अब्दुल सलाम लियाकत मंडल (वय ४०) हा गांजा अमली पदार्थ सिगरेट मध्ये भरून त्याचे सेवन करताना आढळून आल्याने त्याच्याविरोधात तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

### मंदिर परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहरातील कोळेश्वर मंदिराच्या बाजूला एका ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक अनिल राजुरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेलच्या फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना भाडे सवलत

### भाजप सांस्कृतिक सेलच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांच्या भाडेदरांमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय पनवेल महापालिका प्रशासनाने आहे. या कामी भारतीय जनता पक्षाने पाठपुरावा केला होता.



यासंदर्भात ४ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र भाजप सांस्कृतिक सेलच्या पदाधिकाऱ्यांनी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांच्या भाडेदरात सवलत द्यावी, अशी मागणी केली होती. त्यांनी संबंधित खात्याला यासंदर्भात सुचना केल्याने हा सकारात्मक निर्णय झाला. त्याअनुषंगाने भाजपच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

कोविड-१९मुळे मराठी नाट्य व्यवसायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या समस्यांवर मात करत नव्या ताकदीने उभारण्याकरिता महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक खात्याकडून दैनंदिन भाडेदरांमध्ये ७५ टक्के सवलत देण्याविषयीचे पत्र महापालिकेस मिळाले होते. त्यास अनुसरून पनवेल महापालिकेकडून याबाबत प्रशासकीय सर्वसाधारण सभेत ठराव पारित करण्यात आला आहे. या ठरावामध्ये पनवेल महापालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मराठी नाटकांकरीता दैनंदिन भाडेदरामध्ये ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत ७५ टक्के सवलत मंजूर करण्यात आली आहे.

> **कोरोना काळातही अशा प्रकारची मागणी आम्ही पनवेल मनपाकडे सभागह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केली होती. त्या वेळेसही प्रशासनाने ७५ टक्के सूट मंजूर केली होती. त्यानंतर दर आकारणी पूर्ववत झाल्याने भाजप सांस्कृतिक सेलचे प्रदेशाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे यांच्या नेतृत्वाखाली मंत्री मुनगुटीवारांकडे झालेल्या बैठकीतून पुन्हा एकदा ७५ टक्के सवलत देण्यात येत आहे. यामुळे प्रशासनाचे मी आभार मानतो.**
>
> **-अभिषेक पटवर्धन, अध्यक्ष, सांस्कृतिक सेल, उत्तर रायगड**

## सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या, चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात सोमवारी (दि.२६) 'विज्ञानयात्री' अंतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळाव विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा हा या मागचा उद्देश होता.

या विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन डॉ. संतोष आगलावे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनावेळी इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे तसेच सर्व विभागाचे पर्यवेक्षक व परीक्षक उपस्थित होते. पस्थित मान्यवरांचे व परीक्षकांचे स्वागत प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

या प्रदर्शनात इयत्ता चौथी राजगडच्या विद्यार्थ्यांनी अॅटोमेटिक चालू बंद होणारे रस्त्यावरील दिवे या प्रयोगाने प्रथम क्रमांक प्रप्त केला. इयत्ता तिसरी राजगुरूच्या विद्यार्थ्यांनी घरगुती एअर कुलरची प्रतिकृती सादर करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर इयत्ता दुसरी यमुनाच्या विद्यार्थ्यांनी जलवितरण यंत्राची प्रतिकृती सादर करून तृतिय क्रमांक प्राप्त केला आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी फुग्यावर चालणाऱ्या मोटारीचे प्रात्यक्षिक दाखवून उत्तेजनार्थ क्रमांक संपादन केला. पालकांनी उत्स्फूर्तपणे विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हे विज्ञानप्रदर्शन होण्यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

## मानवता फाउंडेशनतर्फे पोलिसांसाठी आरोग्य शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

जनतेला सुरक्षा व सहकार्या देण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलीस बांधवनच्या साठी व त्यांच्या कुटूंबीयांच्या साठी मानवता फाउंडेशन या जगभरात लोकहीतकरी कार्य करणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून आरोग्य शिबिर व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मोठ्या प्रमाणावर पोलीस बांधवांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. मानवता फाउंडेशन च्या वतीने रक्तदाब, सहित किमान ९ तर्हे च्या वेगवेगळ्या टेस्ट व उच्च प्रतीचे चष्मे देखील मोफत देण्यात आले.

या वेळी आयोजक संस्थापक अध्यक्ष संजय पवार, उपाध्यक्ष स्वाती पाटील, कंचन कांबळे, स्वाती पांचाळ, सुरज हिरवे, अक्षय कोळी, रोशन कोळी, अक्षय साळवे, दिनेश पवार, किशोरी लिंबकर, जयश्री पलांडे, प्रशांत अनगुडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेल महापालिका पाणीपुरवठा विभागातर्फे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, उन्हाळ्यातील पाणी टंचाई लक्षात घेता १५ जून २०२३ पर्यंत पाणी पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने २६ डिसेंबरपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवड्यातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे.

सोमवारी सुभेदार वाडा, गुणे हॉस्पिटल, शिवसेना उंच जलकुंभ, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरीपर्यंत, भैरवनाथ डेरी ते ससाने हॉस्पिटलपर्यंत, अशोका गार्डन सोसा. मेवाड हॉटेल ते मशीद - अर्बन को. ऑप. बँक ते गणपती परिसर, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेलपर्यंत घाटे आळी, गावदेवी मंदिर परिसर, गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेसपर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटलपर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटलपर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे, मेन व्हॉल, रचना रेसीडेन्सी सोसा. अष्टविनायक श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, श्री लॉज ते निलेटा गार्डनपर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत इत्यादी. यशोपुरम सोसा. आगरी समाज ते व्ही. के. हायस्कूलपर्यंत, जुने पोस्ट ऑफिस ते डॉ. बुधकर दवाखान्यापर्यंत श्री गांगल यांच्या घरापर्यंत ते मेवाड हॉटेलपर्यंत, जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत, घोडसे आळी बैठी घरे, विरुपाक्ष हॉटेल ते लोंढे मॅडम ह्यांच्या घरापर्यंत, आदर्श हॉटेल ते आदित्य कॉम्पलेक्सपर्यंत,मनिष मार्केट, जय भारत नाका ते बैठी घरे, जैन मंदिरपर्यंत, जय भारत नाका ते रतन टॉकिज पर्यंत, त्रिमुर्ती सहनिवास सोसा. अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत, गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत.

मंगळवारी माणिक नगर, स्नेहसदन सोसायटी, यशोदिप सोसायटी, पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिरपासून भूसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपटटी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रोनिकपर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरा पर्यंत, मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटीपर्यंत, सिटी स्टोर्स गल्ली, सिनियर ज्युनियर गल्ली. आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटलपर्यंत, गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धनपर्यंत. आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंटपर्यत. कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत. मुनोथ नगर ई विंग प्रिन्स पॅराडाईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी. केशव बाग (घतघ) इत्यादी

गुरुवारी मिडलक्लास सोसा. (भाग -१) आमदार निवास रोड परिसर, प्लॉट नं. ११ ते प्लॉट नं. पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रॉल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर, मिडल क्लास सोसायटी भाग २ - गांधी हॉस्पिटल, आय.सी.सी.आय बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल से अक्सिस बैंक पर्यंत, प्लॉट नं. ६४ से रायगड बँक पर्वत, शेषगिरी बंगला ते अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं. ३६ ते रुपाली टॉकिजपर्यंत.

दरम्यान, नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

## संपादकीय

# कोणाच्या बापाची हिंमत?

सीमावासियांचा पुळका महाविकास आघाडीच्या नेत्यांना सध्या आलेला दिसतो, पण महाविकास आघाडीचे हेच नेते चार महिन्यांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रातील सत्तेचे लोणी वाटून खाण्यात मश्गूल होते. त्यांच्याच काळात सीमावासियांसाठी असलेल्या योजना धडाधड बंद झाल्या, हे लोक विसरलेले नाहीत, तर शिंदे-फडणवीस सरकारने या योजना सत्तेवर येताच पुन्हा सुरू केल्या. कर्नाटकचा निषेध करणारा ठराव विधिमंडळात बहुदा मंगळवारी सादर होईल. जशास तसे उत्तर कर्नाटकला मिळेल यात शंका नाही.

**सीमाप्रश्नी सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारला घेरण्याचा एक दुबळा प्रयत्न महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला खरा, परंतु तो त्यांच्यावरच उलटला. गेली अनेक वर्षे न्यायालयात प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद यंदाच्या हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर अचानक प्रकट झाला आहे. सीमावादाचे हे जुने भूत बाटलीतून बाहेर काढले ते कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी. कर्नाटकातील राजकारण सांभाळताना त्यांना सीमाप्रश्न उकरून काढावा लागत आहे ही त्यांच्या स्थानिक राजकारणाची मर्यादा समजावी लागेल. याच प्रश्नी बोम्मई यांनी वादग्रस्त विधाने केल्यानंतर त्याची तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्रात उमटणे स्वाभाविक होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शिष्टाई केल्यानंतरही बोम्मई यांनी महाराष्ट्रविरोधी वक्तव्ये जारीच ठेवली. त्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संयमाने तोंड दिले. वाद टोकाला नेणे सोपे असते. अरेला कारे करणे किंवा फुकाच्या गर्जना करणे यासारखे सोपे राजकारण नाही. नुसती भाषणे देऊन प्रश्न सुटले असते, तर आज महाराष्ट्रासमोर कुठलीच समस्या उरली नसती. शिंदे-फडणवीस यांनी संयम पाळून न्यायालयाचा कौल अंतिम राहील याचा निर्वाळा दिला आहे. याचे कारण त्यांना हा प्रश्न सुटावा, असे प्रामाणिकपणाने वाटते, परंतु महाविकास आघाडीच्या नेत्यांना याचे ना भान, ना कौतुक. उलट राणा भीमदेवी गर्जना करून आक्रस्ताळेपणाचे राजकारण त्यांना हवेहवेसे झाले आहे. म्हणूनच शिवसेनेचे कोकणातील नेते भास्कर जाधव यांनी सोमवारी विधिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री बेळगाव प्रश्नी मान खाली घालून बसले असल्याची टीका केली. भास्कर जाधव यांच्यासारख्या वाचाळ नेत्याकडून फार काही चांगले अपेक्षिण्याची शक्यताच नाही, परंतु त्यांना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मान खाली घातल्याचे कधी दिसले हे एक कोडेच आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याला आणि उपमुख्यमंत्र्याला मान खाली घालावयास लावण्याची कोणाच्या बापात हिंमत आहे असा करडा सवाल फडणवीस यांनी भर सभागृहात केला, तेव्हा भास्कर जाधव यांच्यासह सर्वच विरोधी बाकांवर क्षणभर सन्नाटा पसरला. शिंदे आणि फडणवीस हिच जोडगोळी अनेक वर्षे जुना बेळगाव प्रश्न सोडवून दाखवेल, असा विश्वास महाराष्ट्राच्या जनतेला वाटतो. खरे तर हा प्रश्न ६० वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या मंगल कलशाची स्थापना झाली तेव्हापासूनच उद्भवला आहे. बेळगाव आणि कर्नाटकव्याप्त अन्य मराठी मुलुख परत आपल्या राज्यात यावा म्हणून अनेकांनी बलिदाने दिली. त्याची संपूर्ण जाणीव शिंदे-फडणवीस यांना आहे. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बेळगाव प्रश्नी कर्नाटक पोलिसांचा ४० दिवसांचा तुरुंगवास भोगला आहे. सीमावासियांसाठी स्वत:चे रक्त सांडणारा मुख्यमंत्री सध्या महाराष्ट्राला लाभला आहे. निव्वळ भाषणे देऊन वेळ मारून नेणारे नेते किती कुचकामी असतात ते सीमावासियांनी अनुभवले आहे. सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शिंदे-फडणवीस सरकार इतके सुयोग्य सरकार आजवर आले नव्हते हेच खरे.**

# महाड-रायगड मार्गाच्या कामामध्ये नियोजनाची गरज



खबरबात
महेश शिंदे

महाड-रायगड मार्गाच्या कामामध्ये नियोजनाची गरज असल्याने स्थानिक ग्रामस्थ आणि शिवप्रेमींना धुळीचा, पर्यायी मार्गांचा, आणि अर्धवट कामाचा प्रचंड त्रास होत आहे. धूळ नियंत्रणात आणण्यासाठी पाण्याचा मारा केला जात असल्याने अनेक दुचाकी स्वार अपघात होऊन जखमी झाले आहेत. रस्त्याच्या या कामाकडे लक्ष वेधण्यासाठी मावळा ग्रुपच्या वतीने महामार्ग विभागाला निवेदन सादर करण्यात आले आहे.

ऐतिहासिक किल्ले रायगडावर पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सध्या शैक्षणिक सहलीदेखील मोठ्या प्रमाणावर दाखल होत आहेत. या महाड-रायगड रस्त्याचे रुंदीकरण काम गेली वर्षभरापासून सुरू आहे. सुरुवातीला हे काम ज्या ठेकेदाराने घेतले होते त्याने हे काम अर्धवट ठेवल्याने रखडलेल्या हे काम अक्षय कंपनीला देण्यात आले आहे. अक्षय कन्सट्रक्शन या ठेकेदारानेदेखील नियोजन न करताच संपूर्ण रस्ता खोदून टाकला. त्यातच पावसाळा सुरू झाला आणि या अपूर्ण कामाचा स्थानिक नागरिकांना त्रास झाला. पावसाळा संपताच अक्षय कन्सट्रक्शन या कंपनीने पुन्हा काम सुरू केले, मात्र लाडवलीपासून पुढे केलेला एक मार्ग तसाच ठेवून पुढील मार्ग खोदकाम सुरू केले आहे. मोऱ्यांची कामेदेखील अर्धवट ठेवल्याने या जागी मातीचे उंचवटे निर्माण झाले आहेत. संपूर्ण रस्त्यावर साचलेले खडे, मातीपासून तयार झालेली धूळ याचा दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

महाड-रायगड मार्गाचे काम रखडल्याने गडावर येणाऱ्या वाहनांचे प्रचंड हाल होत आहेत. सुरक्षित वाहतूक व्यवस्था केली नसल्याने रस्त्याच्या कामातील अवजड वाहने याच मार्गावरून ये जा करीत असल्याचे दिसून येत आहे. या वाहनांतून प्रमाणापेक्षा अधिक माती वाहून नेली जात असल्याने शेजारून ये-जा करणाऱ्या दुचाकीस्वरांवार ही माती पडते, तर या वाहनांचा वेगदेखील अधिक असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वी झालेल्या अपघातात अक्षय कन्सट्रक्शन या कंपनीने नुकसान भरपाई दिलेली आहे, मात्र अपघातातील जखमीस मात्र मदत करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या मार्गावर सुमारे शंभराहून अधिक गावे आहेत. या गावातील नागरिकांना प्रतिदिवस महाड शहरात यावेच लागते. शिवाय औद्योगिक क्षेत्रात देखील या परिसरातील शेकडो कामगार आहेत. या कामगारांनादेखील या धुलीमय रस्त्यांचा त्रास होतो. धुळीमुळे दुचाकीस्वरांचे कपडे लाल होत आहेत. यामुळे अनेकजण महाडला येताना सोबत एक शर्ट आणत आहेत असे अविनाश चव्हाण यांनी सांगितले. तेटघर ते कोंझरदरम्यान रस्ता खोदून ठेवला आहे. या खोदकामामुळे वाहनांच्या वर्दळीने धूळ उडत आहे. या धुळीवर नियंत्रण आणण्यासाठी पाणी मारले जाते मात्र पाणी एव्हढ्या मोठ्या प्रमाणावर टाकले जात असल्याने वाहने घसरून अपघात होत आहेत.



महाड-रायगड हा २४ किमी अंतराचा मार्ग आहे. ऐतिहासिक किल्ले रायगड पाहण्यासाठी लाखो पर्यटक दरवर्षी गडावर येत आहेत. त्यातच आता शैक्षणिक सहलींचा काळ आहे. यामुळे दररोज ३० ते ४० शैक्षणिक सहलीच्या बसेस येत आहेत. रस्त्याच्या अनियोजित कामामुळे बसेसना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सुरक्षा यंत्रणा न राबवल्याने ऐन रात्रीच्या सुमारास वाहनचालक हैराण झाले आहेत. जागोजागी असलेले उंचवटे, खड्डे, आणि बाह्य वळणे यामुळे चालक त्रस्त झाले आहेत. महामार्ग बांधकाम विभाग मात्र याकडे डोळेझाक करून आहेत. याबाबत मावळा ग्रुपच्या वतीने हे काम करत असताना रस्ता सुरक्षा बाळगली जात नाही यामुळे अपघात होत आहेत असे सांगून नाते गावापर्यंत असलेला रस्ता पहिला पूर्ण केला जावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. महाड-रायगड मार्ग करताना नियोजन केले नसल्यामुळे जागोजागी केलेले खड्डे, मोऱ्यांचे उंचवटे, मातीचे साम्राज्य यामुळे अपघात होत आहेत. याबाबत या मार्गावरील लाडवली ग्रामपंचायतीतर्फे राष्ट्रीय महामार्ग विभागला निवेदनही देण्यात आले आहे.

किल्ले रायगडच्या मार्गात अनेक तांत्रिक त्रुटी आहेत. मुळात २०१९ आणि २०२१ या वर्षात रायगड विभागात गांधारी खोऱ्यात पडलेल्या प्रचंड अतिवृष्टीचा अभ्यास केलेला नाही. त्यामुळे गांधारीला आलेल्या पुराचे पाणी लाडवली, तेटघर, कोळोसे या गावांत शिरुन नुकसान झाले होते. त्यामुळे या रस्त्याची वाढणारी उंची आणि भराव या गावांना पुराचा धोका वाढविणारा आहे, तसेच या दरम्यान पाणी सुलभपणे वाहून जाण्यासाठी छोटे पूल बांधणे गरजेचे आहे, मात्र तसे न करता सिमेंटचे पाईप टाकून मोऱ्या बांधल्या जात आहेत. या मोऱ्या काट्याकुट्यांमुळे चोकअप होऊन प्रवाह बंद होतो. त्यामुळे भविष्यात पुराच्या पाण्याचा निचरा त्वरीत होणार नाही आणि लोकांचे नुकसान होणार आहे, असे निवेदनात म्हटले असून याबाबत गांभीर्याने विचार करण्याची मागणी होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# ...तर इन्फ्लुएन्सरला भरावा लागणार ५० लाखांचा दंड

सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध उत्पादनाचे प्रमोशन करून सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसर्स लाखो रुपये कमावतात. यात गैर काहीच नाही पण यापुढे हे प्रमोशन करताना जर खालील काही नियमांचे पालन केले नाही तर या इन्फ्ल्यूएंसर्सना ५० लाखांचा दंड भरावा लागू शकतो. सरकारच्या घोषणेनुसार यापुढे सर्व सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसर्सना कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करताना आपल्या टॅबवर पेड प्रमोशन, म्हणजेच आपण जाहिरात करीत असल्याचा खुलासा करणे अनिवार्य असणार आहे. असे न झाल्यास त्या व्हिडिओला दिशाभूल करणारी जाहिरात समजून त्याचे गंभीर परिणाम संबंधित इन्फ्ल्यूएंसर्सना भोगावे लागू शकतील.

ग्राहक व्यवहार मंत्रालय सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसर्ससाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याच्या तयारीत आहे. त्याअंतर्गत, इन्फ्ल्यूएंसर्सनी त्यांच्या फॉलोवर्सना उत्पादनाच्या जाहिरातीसाठी पैसे घेतले असल्यास ते उघड करावे लागेल. असे न केल्यास संबंधित इन्फ्ल्यूएंसर्सच्या विरोधात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाकडे तक्रार केली जाऊ शकते आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

अनेकदा काही सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसर्स सोशल मीडिया हॅंडलवर उत्पादनांचा केवळ पैसे घेतले आहेत म्हणून प्रचार करतात पण ते स्वतः त्या उत्पादनांचा वापर करतच नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांना ते उत्पादन नेमके काय आहे हे ही माहित नसते. अशावेळी त्यांचे फॉलोअर्स आंधळा विश्वास टाकून ते उत्पादन विकत घेतात यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. हेच टाळण्यासाठी सरकारकडून अधिकृत नियम बनवण्यात येणार आहे.

नवीन मार्गदर्शक तत्त्वे केवळ सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स पुरतेच मर्यादित राहणार नाही तर, हा नियम कलाकार व अन्य सेलिब्रिटींनासुद्धा लागू होणार आहे. कोणत्याही प्रकारच्या खोट्या दाव्यांपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जात आहेत.

सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसर्स ज्यांना विशिष्ट ब्रॅंडकडून मोफत उत्पादने मिळतात त्यांना ती मिळवण्यासाठी कर भरावा लागतो. कार, मोबाइल, सौंदर्य प्रसाधने, पोशाख यांसारखे उत्पादन मिळाल्यास आणि ते ठेवण्याचा निर्णय घेतल्यास ते टक्के टीडीएस भरण्यास जबाबदार आहेत. तथापि, जर प्रभावकांनी सेवा वापरल्यानंतर कंपनीला उत्पादन परत केले तर त्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही.

# बॉलिवूडमधील 'भाईजान' : सलमान खान



निमित्त

हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध व यशस्वी अभिनेता म्हणून सलमान खानची संपूर्ण जगात ओळख आहे. संपूर्ण जगात त्याचा एक फॅन फॉलोईंग आहे. आज त्याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्याबद्दलच्या गोष्टी जाणून घेऊया...

सलमान खानचे संपूर्ण नाव अब्दुल रशीद सलीम सलमान खान आहे. सलमानचे वडील मुस्लिम आणि आई हिंदू आहे. सलीम खान यांची दुसरी पत्नी ख्रिश्चन आहे. म्हणून प्रत्येक सण सलमान हा संपूर्ण उत्साहाने साजरे करतो. तो आपल्या कुटूंबाला मिनी इंडिया म्हणतो.

सलमान खानाने इ. स. १९८८ साली बीवी हो तो ऐसी या हिंदी चित्रपटातील छोटेखानी भूमिकेद्वारे चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. इ. स. १९८९ साली सलमानाने प्रमुख नायकाची भूमिका साकारलेल्या मैने प्यार किया या हिंदी चित्रपटाने प्रचंड व्यावसायिक यश कमवले व त्या वर्षीचा फिल्मफेअर पुरस्कार त्याला मिळवून दिला. त्यानंतर साजन (इ. स. १९९१), हम आपके हैं कौन..! (इ. स. १९९४), करण अर्जुन (इ. स. १९९५), जुडवा (इ. स. १९९७), प्यार किया तो डरना क्या (इ. स. १९९८) व बीवी नं. १ (इ. स. १९९९) या इ. स. १९९० च्या दशकात गाजलेल्या चित्रपटांत त्याने अभिनय केला. १९९९ मध्ये सलमान खानला अतिथि-भूमिकासाठी, १९९८मधील कुछ कुछ होता है या सिनेमासाठी फिल्मफेअर सर्वोत्तम सहाय्यक अभिनेता पुरस्कार मिळाला.


हिंदी चित्रपटसृष्टीतील पटकथालेखक सलीम खान हे त्याचे वडील असून अरबाझ खान, सोहेल खान हे त्याचे भाऊ आणि बहीणअर्पपित असे आहेत. २०११मध्ये त्याने स्वता:ची निर्माण कंपनी काढली.ते कंपनीचे नाव सलमान खान बीइंग प्रोडकशन आहे. निर्माता म्हणून चिल्लर पार्टी हा सलमान खानचा पहिला चित्रपट आहे. या चित्रपटाला तीन राष्ट्रीय पुरस्काराने सम्मानित केले आहे. त्याला दबंगखान, टायगर खान, भाईजान, सलमान भाई आदी नावांनी ओळखले जाते. सलमानने आपल्या अभिनयाची सुरुवात १९८८ मध्ये सहायक अभिनेता म्हणुन 'बिवी हो तो ऐसि'या चित्रपतटातून केली. सुरज बरजात्या यांच्या 'मैने प्यार किया'(१९८९)हा सलमानचा प्रमुख भूमिका असलेला पहिला चित्रपट होता. यासाठी त्याला फिल्मफेर सर्वोत्कृष्ट अभिनेताचे नामांकन मिळाले होते.

सलमान खानला अभिनेता नव्हे तर चित्रपट दिग्दर्शक बनण्याची इच्छा होती, परंतु त्यांचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व पाहून लोक त्याला अभिनेता म्हणून स्वीकारू इच्छित होते. सलमान खान त्याच्या आईचा एक महान भक्त असल्याचे म्हटले जाते. हेच कारण आहे की, जेव्हा ते शूटवर असतात तेव्हा त्याच्या आईचे हाताचे जेवण आणल्याचे सेटवर बरेचदा आढळते.

सलमानने धर्मेंद्रसोबत प्यार किया तो डरना क्या चित्रपट केले आहे. असे म्हणतात की, या चित्रपटात काम करण्याच्या बदल्यात धर्मेंद्रने पैसे घेतले नाहीत, तसेच सलमान हेमा मालिनीला त्याची आवडती नायिका सांगतो. २००४मध्ये पीपल मॅगझिनने सलमानला जगातील सर्वोत्कृष्ट लुकिंग मॅनच्या यादीमध्ये सातवे स्थान मिळवून दिले.

**-साभार विकीपिडीया**

## आरोग्य प्रहर



# चिरतरूण राहण्यासाठी करा काजूचे सेवन

सुक्या मेव्यामध्ये सर्वात लोकप्रिय म्हणून काजूची गणना होऊ शकते. बालकांपासून ते वयोवृद्धांपर्यंत काजू सर्वांनाच आवडतो. खाण्यास अतिशय सोपा व कुठल्याही मेव्यासोबत खाल्ल्यास त्याची रुची व पौष्टिकता अजूनच वाढवतो. काजू फळ सुवासिक, रसाळ व पातळ सालीचे असते. आरोग्याच्या दृष्टीने तेही खाण्यास उत्तम आहे. याच्या रसाचे सरबतदेखील करतात.

-रोज पहाटे उपाशीपोटी चार काजू मधासोबत खावे. स्मरणशक्ती व बुद्धी वाढण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो.

-काजूचे पिकलेले फळ, सुंठ, मिरे व सैंधव घालून खाल्ल्यास पोटदुखी कमी होते, तसेच पोटात गुब्बारा धरणे, शौचास साफ न होणे ही लक्षणे कमी होतात.

-भिजविलेल्या मनुक्यासह चार-पाच काजू रोज सकाळी खाल्ल्यास मलावरोध दूर होतो.

-काखेमध्ये एखादी गाठ झाली असेल ती पिकण्यासाठी काजूच्या कच्च्या फळांचा गर उगाळून काखेतील गाठीवर लावावा. यामुळे ती गाठ लवकर पिकून फुटते व त्वरीत आराम मिळतो.

-पायांना भेगा पडल्या असतील तर काजूचे तेल लावून पायात मोजे घालावेत, काही दिवसातच भेगा नाहीशा होतात.

-काजू पित्तकर असल्याने तो नेहमी अंजीर, बदाम व मनुका या सोबत खाल्ल्याने उष्णतेचे विकार होत नाहीत.

-काजूमध्ये 'ब' जीवनसत्व जास्त प्रमाणात असल्याने भूक मंद झाली असेल, तर रोज सकाळी अर्धा कप दुधातून चार-पाच काजू बारीक करून घ्यावेत. यामुळे अग्नी प्रदिप्त होऊन भूक लागते.

-थकवा व नैराश्य आल्यास नियमित काजू सेवन करावे यामुळे मज्जासंस्था उत्तेजित होऊन शरीर कार्यक्षम बनते.

-रक्ताची कमतरता झाली असेल तर रोज चार ते पाच काजूचे सेवन करावे. यामध्ये लोह भरपूर प्रमाणात असल्याने रक्त वाढण्यास मदत होते.

-वृद्धत्व टाळून चिरतारुण्य टिकविण्यासाठी व शरीर काटक व प्रमाणबद्ध करण्यासाठी काजूचे सेवन नियमितपणे करावे.

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक मुरुड समुद्रकिनारी दाखल झाले आहेत. जंजिरा किल्ला पाहण्यासाठीही रांगा लागल्या आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

# अतिउत्साही पर्यटकांवर पोलिसांचा वॉच

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येनी पर्यटक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वहातुक कोंडी टाळण्यासाठी रायगड पोलीस सज्ज झाले आहेत. जिल्ह्यात पोलीस बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली आहे. वाहतुक नियंत्रणासाठी ८६ ठिकाणी ९० वाहतूक पोलीस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. अतिउत्साही पर्यटकांवर, मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या चालकांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे. सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलिसांच्या तीन स्पीड बोटी रात्र दिवस गस्ती ठेवण्यात येणार आहेत.



जल्ह्यात जवळपास २५ हजार पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे वाहनांची संख्या प्रचंड वाढली होती. त्यामुळे कोंडी झाली होती. वडखळ बायपास ते पेझारी हे आठ ते दहा किलोमिटरचे अंतर पार पाडण्यासाठी दिड ते दोन तास लागत होते. त्यामुळे वाहनचालक आणि प्रावाश्यांचे हाल झाले होते. त्यामुळे वाहतुक नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

शनिवारी आणि रविवारी दिवस झालेली वाहतुक कोंडी लक्षात घेऊन, वाहतुक नियमानासाठी विशेष खबरदारी घेतली जाणार आहे. वाहतुक निंयत्रणासाठी ८६ ठिकाणी ९० वाहतुक पोलीस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. मद्यपी वाहनचालकांवर या सर्वांची नजर असणार आहे.

पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जिल्ह्यातील प्रमुख समुद्र किनाऱ्यांवर तात्पुरत्या पोलीस चौक्या उभारण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी २४ तास पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. बीट मार्शल्स, दामिनी पथक, साध्या गणवेषातील कर्मचाऱ्यांसह, सशस्त्र पोलीस बंदोबस्त किनाऱ्यांवर ठेवला जाणार आहे. ७६ अधिकारी ४१२ पोलीस अंमलदार तैनात केल्या जाणार आहेत.

पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ठिकठिकाणी न्यु ईअर सेलिब्रेशन पार्टीजचे आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल व्यवसायिकांनी ऑर्केस्ट्रा, डिजे नाईट्स, गाला डान्स, सेलिब्रिटी नाईट्सची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. कपल एन्ट्रीसाठी निरनिराळ्या ऑफर्स पुरवल्या जात आहे. पार्टीनवर पोलिसांची नजर राहणार आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याकडे विशेष पथके तयार करण्यात आलेली असुन हॉटेल, धाबे, कॉटेज, फार्म हाउस येथे गैरकृत्य होणार नाही याकडे लक्ष ठेवण्यात येणार आहे. दारू पिवुन गोंधळ घालणे, दारूच्या नशेत वाहन चालविणे अशा प्रकारांवर कारवाई करण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस पथके नेमण्यात आलेली आहेत. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने साध्या वेशातील पोलीस व महिला अंमलदार यांची स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत.

## रायगड जिल्ह्यात मोठा बंदोबस्त

### मासळीच्या मागणीत वाढ

नववर्ष स्वागतासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक आले आहेत. यामुळे मासळीच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. मागणीच्या प्रमाणात पुरवठा कमी असल्याने मासळीचे दर वाढले आहेत. यामुळे पर्यटकांना मासळीवर ताव मारताना विचार करावा लागत आहे.

### हॉटेलमध्ये बुकिंग फूल्ल

जिल्ह्यातील हॉटेलमध्ये ९० टक्के बुकिंग झाले आहे. आयत्या वेळी बुकींग करण्यासाठी पर्यटकांना जादा पैसे मोजावे लागत आहेत. प्रमुख पर्यटनस्थळांवरील राहण्याचे बुकींग याआधीच झाल्याने आयत्यावेळी बेत केलेल्या पर्यटकांना समस्यांचा सामना करावा लागतोय.

## तुपगावात वानरांचा धुमाकूळ, नागरिक त्रस्त



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तुपगाव ग्रामपंचायत हद्दीतील ब्राह्मणआळी परीसरात वानरांनी धुमाकूळ घातल्याने तेथील रहिवाशी त्रस्त झाले होते. येथील वानरांनी एकप्रकारे दहशतच निर्माण केल्याने ज्येष्ठ नागरिक, महिलांना व शाळकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रासले होते. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता.ब्राम्हण आळी परीसरातून प्रवास करत असताना नागरिक हातात काठी घेऊनच घराबाहेर पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत होते.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार यांना सांगून या वानरांचा बंदोबस्त करावा अशी विनंती केली होती. यावर तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर तसेच ग्रामपंचायत सदस्य सचिन साखरे, स्वाती जाधव ग्रामपंचायत सदस्य यांनी त्वरित एका खासगी पुनर्वसन अशा नावाच्या संस्थेला व वन्य प्राणीमित्रांना प्राचारण करून सदर वानरांना पकडुन सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याचे काम सुरू केले आहे.


CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## NOTICE

**UNDER SECTION 60(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**
**Town Planning Scheme No. 09 (TPS-9)**
**No. CIDCO/Planning/NAINA/CP/DP/TPS-09/2022/2026**

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS-1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also vide Notification No. TPS. 1215/245/C.R.332/16/EP/UD-12, dated 01.03.2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16.09.2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA and also vide Notification No. TPS. 1221/1041/C.R.71/21/UD-12, dated 24.06.2022 has partly sanctioned the Excluded Parts of the DP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No 12287, dated 16.01.2020, had declared its intention under sub-section (1) of Section 60 of the Act, for making Town Planning Scheme No. 09 (hereinafter referred to as "TPS-09") at part of Villages of Belavali, Borle, Chikhale, Kon and Sangade of Taluka–Panvel, District Raigad and a notice about declaration of making Scheme No. 09 has been published in the Extraordinary Official Maharashtra Government Gazette (part-II) dated 06/02/2020 as well as in the daily newspapers "Karnala" and "Krushival" in English and Marathi dated 12/02/2020 under sub-section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, vide Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the state Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded;

And whereas, such prescribed time limit is still in existence on excluding the period of lockdown declared due to spread of Covid-19 virus in the State of Maharashtra, by the Government from 23/03/2020;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board vide Resolution No. 12551, dated 02.04.2022, had accorded approval for inclusion of additional area in declared TPS-9 under Section 62 of the said Act and CIDCO declared its intention for making Town Planning Scheme at additional area in part villages of Bhingar, Bherle, Lonivali and Wardoli of Taluka Panvel, District Raigad under Sub-section (1) of Section 60 of the Act and published a notice about declaration of making TPS-09 with additional area in the Maharashtra Government official Gazette (Part-II) dated 25-31.08.2022 as well as in the daily newspapers "Newsband" and "Ramprahar" in English and Marathi dated 02.09.2022 under Sub-Section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, all the orders that are currently in force for the imposition of restriction related to COVID-19 under Disaster Management Act, 2005 are withdrawn and no longer be in force from 01.04.2022 by order of Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation dated 31.03.2022;

And whereas, both the declarations of intention published in Maharashtra Government official gazette vide CIDCO/NAINA/CP/BN-36/TPS9/2020 dated 06.02.2020 and vide CIDCO/NAINA/CP/BN-36/TPS-09/2022/1687 dated 25-31.08.2022 to prepare TPS-09 have lapsed and any such lapse in declaration does not debar the Planning Authority from making fresh declaration any time in respect of the same area as per Sub-section (2) of Section 61 of the said Act;

Now therefore, Board of CIDCO acknowledged the insufficient time left to prepare Draft scheme and accorded approval for fresh declaration of Town Planning Scheme No. 09 with same scheme boundary under Sub-section (2) of with Section 61 of the said Act, vide Resolution No. 12632, dated 09.12.2022, and at the same time declared its intention for making Town Planning Scheme No.09 at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Belavali, Bherle, Bhingar, Borle, Chikhale, Kon, Loniwali, Sangade and Wardoli of Taluka Panvel, District Raigad under Sub-section (1) of Section 60 of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub Section (2) of the Section 60 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme No. 09 (TPS-9) at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Belavali, Bherle, Bhingar, Borle, Chikhale, Kon, Loniwali, Sangade and Wardoli of Taluka Panvel, District Raigad.

Land owners who are having valid building permission obtained from Competent Authority, falling within the boundary of proposed TPS No. 09 at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Belavali, Bherle, Bhingar, Borle, Chikhale, Kon, Loniwali, Sangade and Wardoli of Taluka Panvel, District Raigad are requested to submit details of the same to NAINA office. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of Section 60(3) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the area included in the Town Planning Scheme No. 09 (shown by PINK border) is kept open for inspection by the public in the office of Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400 614 during office hours.

Copies of the plan showing the area included are also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice and plans are available on CIDCO's website http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.

The area included in the Town Planning Scheme No. 09 (TPS-9) is bounded as stated below;

On the North - Boundary of TP scheme no. 8 and Boundaries of TPS-1 (Pocket 2) and TPS-2 (Pocket 2) falling in Sangade and Belavali villages, Mumbai Pune Expressway

On the East - Boundary of proposed Integrated Township Project at village Wardoli.

On the South - Boundary of NAINA & MSRDC jurisdiction along Village Boundary of Sangade, Borle, Kon

On the West - Boundary of TP scheme no. 10, falling in part of Villages Kon and Chikhale

By the order of Board of Directors of the Corporation.
Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman Point, Mumbai-400 021.
Date : 21.12.2022

**(Ravindrakumar M. Mankar)**
**Chief Planner (NAINA)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६२ च्या अनुषंगाने कलम ६० च्या उपकलम (२) नुसार**
**नगर रचना परीयोजना क्रमांक ९ (टीपीएस-९)**
**क्र. सिडको/नियोजन/नैना/मु. नि./वि.आ./टीपीएस-०९/२०२२/२०२६**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी)(येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/सीआर-३३२/२०१५/एस.एम./यूडी-१२, दिनांक २७/०४/२०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे. आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१७१७/एमआयएस२७५०/सीआर-९१/२०१९/यूडी-१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२२१/१०४१/प्र.क्र. ७१/२१/नवि-१२ दिनांक २४ जून २०२२ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार विकास आराखड्याचा वगळलेले भाग अंशतः मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या दिनांक १६ जानेवारी २०२० रोजीच्या ठराव क्र. १२२८७ अन्वये पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील बेलवली, सांगडे, बोर्ले, कोन आणि चिखले यांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०९ (येथून पुढे टीपीएस-०९ असे निर्देशित करण्यात येईल) करण्याकरीता, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस-०९ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक ०६ फेब्रुवारी २०२० रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग-२) आणि स्थानिक वृत्तपत्र "कर्नाळा" आणि "कृषीवल" यांत दिनांक १२ फेब्रुवारी २०२० रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना (सुधारणा) अध्यादेश २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८ (अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेताना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्यारोगाच्या फैलावास किंवा आपत्ती जन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थितो, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च २०२० पासून कोव्हीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अजून अस्तित्वात आहे;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०२ एप्रिल २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, घोषित केलेल्या नगररचना परीयोजना क्रमांक ०९ मध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील भिंगार, भेरले, लोणिवली आणि वारदोली गावांच्या काही भागाच्या समावेशासाठी उक्त अधिनियमातील कलम ६२ नुसार मंजूरी दिली आणि उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सदर भागात, नगररचना परीयोजना करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजीच्या अधिकृत महाराष्ट्र शासन राजपत्र (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्र 'न्युज बँड' आणि 'रामप्रहर' यांत दिनांक २ सप्टेंबर २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ या कायद्या अंतर्गत यापूर्वी कोव्हीड-१९ बाबत लावण्यात आलेले सर्व निर्बंध हे दिनांक १ एप्रिल २०२२ पासून मागे घेण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, टीपीएस-०९ तयार करण्याकरीत महाराष्ट्र शासन अधिकृत राजपत्रात क्रमांक सिडको/नैना/मु. नि./बीएन-३६/टीपीएस-९/२०२० अन्वये दिनांक ०६ फेब्रुवारी २०२० रोजी व क्र. सिडको/नैना/मु. नि./बीएन-३६/टीपीएस-९/२०२२/१६८७ अन्वये दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या घोषणा व्यपगत झाल्या आहेत आणि अशा घोषणा कोणत्याही प्रकारे व्यपगत झाल्यामुळे नियोजन प्राधिकरणास त्याच क्षेत्राच्या संबंधात कोणत्याही वेळी नवीन घोषणा करण्यास उक्त अधिनियमातील कलाम ६१ च्या उप-कलम (२) नुसार प्रतिरोध असणार नाही.

आता म्हणून, प्रारूप परियोजना तयार करणेकरीता पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याची दखल घेऊन सिडको संचालक मंडळाने आहे तेच सीमाक्षेत्र कायम ठेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ६१(२) च्या अनुषंगाने कलम ६० च्या उप-कलम (१) अन्वये टीपीएस–०९ तयार करण्याचा उद्देश नव्याने घोषित करण्यास संचालक मंडळाच्या दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १२६३२ अन्वये मान्यता दिली आणि त्याचवेळी उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (१) अन्वये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे बेलवली, भेरले, भिंगार, बोर्ले, चिखले, कोन, लोणीवली, सांगडे आणि वारडोली येथील काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०९ (टीपीएस–०९) करण्याचा इरादा घोषित केला आहे.

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महामंडळ याद्वारे नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे बेलवली, भेरले, भिंगार, बोर्ले, चिखले, कोन, लोणीवली, सांगडे आणि वारडोली येथील काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०९ (टीपीएस–०९) करण्याचा इरादा घोषित करत आहे.

प्रस्तावित टीपीएस नं. ९ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील बेलवली, भेरले, भिंगार, बोर्ले, चिखले, कोन, लोणीवली, सांगडे आणि वारडोली येथील जमिनीवर सक्षम प्राधिकरणाकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन मालकांची संयुक्तीकपणे किंवा वैयक्तिकरित्या जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळविण्यास इच्छुक असतील तर त्याना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसाच्या आत संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक ०९ ची घोषणा व त्यामध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या अवलोकनार्थ मुख्य नियोजनकार (नैना), ८वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध राहतील. सदर सुचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx. येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगर रचना परीयोजना क्रमांक ०९ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

उत्तरेला - टीपीएस-०८ ची हद्द, सांगडे आणि बेलवली गावातील टीपीएस -०१ (पॉकेट २) आणि टीपीएस -०२ (पॉकेट २) ची हद्द, मुंबई पुणे द्रुतगती मार्ग.

पूर्वेला - वारदोली गावांत प्रस्तावित विशेष नगर वसाहत प्रकल्पाची हद्द.

दक्षिणेला - सांगडे, बोर्ले, कोन गावाच्या हद्दीसह नैना आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. वि.नि.प्रा. ची सीमा

पश्चिमेला - टीपीएस - १० ची हद्द, चिखले आणि कोन या गावांचा काही भाग

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार.
नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दिनांक : २१.१२.२०२२

**(रविंद्रकुमार म. मानकर)**
**मुख्य नियोजनकार (नैना)**

www.cidco.maharashtra.gov.in

CIDCO/PR/385/2022-23

# कामगारांच्या प्रश्नावर शासन सकारात्मक

## न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील -आमदार गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाच्या बंद पडलेल्या बीएमटीसी परिवहन सेवेतील १५८७ कामगारांना शासनाने मंजूर केल्याप्रमाणे शंभर १०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या दुकानांच्या गाळ्याचे विनाविलंब तातडीने वितरण करावे, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ डिसेंबर २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे. या मागणीवर शासनाच्या वतीने सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून बीएमटीसीच्या कामगारांना न्याय मिळणार आहे. जोपर्यंत बीएमटीसी कामगारांना दुकानांच्या गाळ्यांचे वाटप होत नाही तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरूच राहील, अशी प्रतिक्रिया आमदार गणेश नाईक यांनी दिली आहे.



सिडकोने नवी मुंबई शहराची निर्मिती करताना मुंबईच्या बेस्टच्या धर्तीवर १९७४ साली बीएमटीसी परिवहनसेवा सुरू केली. उरण, पनवेल, नवी मुंबई आणि दादर या ठिकाणी बीएमटीसी प्रवासीसेवा देत होती. बारा वर्षे सेवा दिल्यानंतर ९ फेब्रुवारी १९८४ मध्ये ही सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. अचानक बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळल्याने १५८७ कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यांची आर्थिक परिस्थिती ढसळली. बीएमटीसी परिवहन कर्मचाऱ्यांना सिडकोने योग्य तो मोबदला दिला नाही. मागील ३८ वर्षे हे कामगार त्यांना न्याय मिळण्यासाठी लढा देत आहे.

बीएमटीसी कामगार किंवा त्यांच्या वारसांना नवी मुंबईमध्ये १०० चौरस फूट आकाराचे दुकानाचे गाळे किंवा भूखंड देण्याचा ठराव सिडकोच्या संचालक मंडळाने १० जुलै २०१३ रोजीच्या ठरावानुसार बैठकीत मंजूर केला. राज्याच्या नगरविकास विभागाचे तत्कालीन उपसचिव एस. के. सालेमठ यांनी ९ सप्टेंबर २०१४ च्या मंजुरी पत्रानुसार ११ सप्टेंबर २०१३ रोजीच्या सिडकोच्या पत्रान्वये १०० चौरस फुटांचे दुकानांचे गाळे बीएमटीसी कामगारांना देण्याचे जाहीर केले. या प्रस्तावाला शासनाकडून देखील मान्यता देण्यात आली होती, परंतु शासनाचा आदेश असतानाही आजपर्यंत सिडकोने या आदेशाची अंमलबजावणी करण्यात उदासीनता दाखवली आहे.

सिडकोच्या या भूमिकेविरोधात बीएमटीसी कामगारांमध्ये प्रचंड आक्रोश आणि तीव्र संताप आहे. या विषयाची तत्परतेने गंभीर दखल घेऊन शासनाने बीएमटीसी कामगारांना गाळे वाटपाबाबत घेतलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश शासनाने सिडको महामंडळाला द्यावेत, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना केली आहे. त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन मिळालेले आहे.

# पनवेल परिसरात रानमोडी तणाचे वेगाने अतिक्रमण

## जैवविविधतेला धोका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण तालुका रानमोडी या तणामुळे व्यापला असून, त्याच्या उच्चाटनाची मोहीम राबवण्याची गरज निर्माण झाली आहे. पनवेलचा पूर्व ग्रामीण भाग, कर्नाळा अभयारण्य व जंगल परिसरात स्थानिक गवताच्या जागी विदेशी रानमोडीसारखे तण वेगाने अतिक्रमण करत आहेत.

पनवेलच्या ग्रामीण भागासह शहरी भागात रस्त्याच्या कडेला, शेताच्या बांधावर दिसणारी सफेद फुले, हिरवीगार पाने अन पांढऱ्या बियांचा फुलोरा असलेले हे झुडूपे दिसून येत आहेत. ती झुडपे शोभेची नसून ती परदेशी तण आहे. युपॅटोरियम ओडोरॅटम (रानमोडी/जंगलमोडी) असे शास्त्रीय नाव असलेल्या या विदेशी तणाची आहेत. या गवताचे बीज १९७२ च्या दुष्काळात आयात केलेल्या धान्याबरोबर आल्याचे मानले जाते. कारण तत्पूर्वी अशा प्रकारचे गवत आपल्याकडे नसल्याचे ज्येष्ठ नागरिक पुंडलिक पाटील सांगत आहेत. केवळ पनवेल परिसरच नाही; तर उर्वरित महाराष्ट्रातही या तणाचे लोण पसरले आहे. ग्रामीण भागासह पनवेल शहरातील वसाहतीमधील मोकळ्या जागांवर ते गतीने वाढत आहे. हे तण वेळीच निर्मूलन झाले नाही; तर शेतीला अन जंगलाला पर्यायाने जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या संदर्भात पनवेल वन विभागाचे अधिकारी डी. एस. सोनवणे यांच्याशी संपर्क साधला असता अशा प्रकारच्या वनस्पतीविषयी अनभिज्ञ असल्याचे त्यांनी सांगितले.

दक्षिण अमेरिका, मेक्सिको, कॅरिबियन बेटे, आशिया, पश्चिम आफ्रिका, ऑस्ट्रेलियात ते आढळते. हे गवत सूर्यफुलाच्या कुळातील युपॅटोरियम ओडोरॅटम्च्या अनेक प्रजातींमधील आहे. प्रा. डॉ. मधुकर बाचुळकर, वनस्पतीशास्त्रज्ञ यांच्यासह अनेक निसर्ग अभ्यासकांनी त्याला दुजोरा दिला आहे. या तणाला असंख्य बिया येतात. बिया पक्व झाल्या की, फुलोऱ्याच्या साह्याने वाऱ्याच्या माध्यमातून प्रसार होण्यास सुरुवात होते. जनावरे, पक्षी या तणाला हात लावत नाहीत. खातही नाहीत. विशेषत: पावसाळा अन हिवाळ्यात ते अधिक गतीने वाढत जाते. तिचे परागकण व बारीक पाकळ्या मोठ्या प्रमाणावर हवेत पसरत असल्याने अनेकांना श्वसनाचा त्रासही होतो. पावसाळा संपल्यानंतर अनेक झुडपे आणि विविध प्रकारच्या गवताची वाढ थांबते किंवा मरण पावतात. परंतु रानमोडीची दाट हिरवाई कायम आहे. हिच्या झुडूपावर ९० ते ८० हजार बिया तयार होतात. ते २० फुटांपर्यंत वाढू शकते. त्यामुळे ते अतिशय वेगाने पसरत आहे.



### शेतीसह पशुपालन व्यवसायावर परिणाम

**पनवेल शहरातील व वसाहतीच्या मोकळ्या जागांत, माती-कचऱ्याच्या ढिगाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात हे गवत आढळत आहे. अगदी शेतातील बांधावर, कुरणांत हे तण पसरत चालले आहे. त्यामुळेच भविष्यात या तणामुळे ग्रामीण भागातील गवत नष्ट होईल. थोड्या फार प्रमाणात शेतीसोबत पशुपालनाचा व्यवसायही संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे.**

**रानमोडी ही परदेशी वनस्पती दक्षिण अमेरिकेतून आली आहे. ती निरोपयोगी असून अन्य स्थानिक झाडे आणि गवताच्या वाढीसाठी अडथळा ठरत आहे. जैवविविधतेलाही तिच्यामुळे धोका निर्माण होत आहे. रानमोडीमुळे स्थानिक गवताच्या प्रजाती आणि इतर पावसाळी वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होत आहे. ही वनस्पती हायली फ्लेमेबल असल्याने वणवा लागल्यावर ती अधिक जलद पसरवण्याचे काम या वनस्पतीमुळे वाढले आहे.**

**-मीनेश गाडगीळ, कृषीभूषण, सेंद्रिय शेती संशोधक, पनवेल**

# नवीन वर्षाचे सेलिब्रेशन करताना आरोग्याची विशेष काळजी घ्या

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यभरात कोरोना रुग्णांची संख्या कमी असली तरी चीन, जपान, ब्राझील, अमेरिका या देशांमध्ये कोरोनाचा प्रसार वेगाने वाढत आहे. सध्या आपल्याकडे असलेला ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनमध्ये या पार्श्वभूमीवर विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले आहे.

चीन आणि जपानमध्ये करोनाचा प्रसार वेगाने वाढत आहे. फुटबॉलच्या स्पर्धेमुळे जगभरातील नागरिक नुकतेच एका ठिकाणी आले होते आणि आता परत ते त्यांच्या देशांमध्ये परतले आहेत. या माध्यमातून संसर्ग प्रसार पुन्हा वाढण्याची शक्यता जास्त आहे. भारतामध्येही रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता असल्याने करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन पुन्हा सुरू करणे गरजेचे आहे. हाताची स्वच्छता आणि मास्कचा वापर यावर प्राधान्याने भर देणे आवश्यक आहे. लसीकरण झाल्यामुळे आपल्याकडे करोनाबाबत फारसे गांभीर्य राहिलेले नाही, परंतु आता

### डॉक्टरांचा सल्ला

परदेशात वाढणाऱ्या प्रसारामुळे पुन्हा सावधता बाळगणे गरजेचे आहे, असे नवी मुंबईच्या मेडिकव्हर रुग्णाल्याचे कन्स्लटंट फिजिशियन डॉ. मनिष पेंडसेयांनी सांगितले.

एकीकडे थंडी वाढत असताना दुसरीकडे चीनमध्ये कोरोना रूग्ण वाढत असल्याचं समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घेणं गरजेचं आहे. ३१ डिसेंबर जवळ येत असल्याने अनेक लोक सुट्ट्यांची योजना आखतात. अशावेळी गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्कचा वापर करावा. याशिवाय ज्यांनी बुस्टर डोस घेतलेला नसेल त्यांनी तो लगेचच घ्यावा. हात न धुता तोंड, नाक, डोळे, कान यांना स्पर्श करू नका. सहलीला जाताना सोबत वयस्कर व्यक्ती आणि लहान मुले असल्यास शाल व गरम कपडे घ्या. ताप, अंगदुखी, खोकला, डोकेदुखी, पोटासंबंधी समस्या यासारख्या आजारांवरील औषधं सोबत बाळगा. विशेषत: तुम्ही लहान मुलांसोबत प्रवास करत असाल तर काही आवश्यक औषधे सोबत ठेवा. लहान मुलांना दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर सर्दी आणि फ्लू होतो. हे टाळण्यासाठी आवश्यक औषधे सोबत ठेवण्याचा सल्ला गोरेगावच्या एसआरव्ही रुग्णालयाचे फिजिशियन कन्सल्टंट डॉ. अजित शेट्टी यांनी दिला आहे.

ताप, खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे ही लक्षणे दिसत असतील किंवा मधुमेहासारखे दीर्घकालीन आजार असल्यास किंवा याआधी न्युमोनियासारख्या आजारांची बाधा झाल्यामुळे फुफ्फुसाला त्रास झाला होता तर या व्यक्तींनी प्रवास करण्यापूर्वी करोनाची चाचणी करून घेणे महत्त्वाचे आहे. ही चाचणी अधिकृत प्रयोगशाळांमध्ये करावी. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर अनेकजण सेलिब्रेशनच्या मूडमध्ये आहेत. पार्टी करताना रेस्टॉरंट, क्लब अशा गर्दीच्या ठिकाणी शक्यतो जाणे टाळावे. सेलिब्रेशन करताना आपण आपला जीव धोक्यात तर घालत नाही ना याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे डॉ. पेंडसे यांनी सांगितले.

# थंडी वाढली; आजारांना आमंत्रण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेले काही दिवस रायगडासह राज्यात थंडीच्या हंगामातही कडक उन्हाळा जाणवत होता. त्यानंतर आता अचानक थंडी वाढली आहे. अशा थंडीत विविध आजारांना आमंत्रण मिळत आहे. डॉक्टरांनी आरोग्याची विषेश काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

अचानक वाढणारी थंडी व कोरोनाचा पुन्हा पसरणारा प्रादुर्भाव यामुळे मानवाच्या शरीरावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. सर्दी, खोकला, घसा खवखवणे अशा अनेक आजारांना आमंत्रण मिळत आहे.

# गोल्डन ग्रुप पनवेलच्या अध्यक्षपदी अमोल गोवारी

**कळंबोली : बातमीदार**

गोल्डन ग्रुप पनवेलच्या काल झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये पुढील वर्षाकरिता नवीन कार्यकारणी निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी अमोल गोवारी, उपाध्यक्षपदी विजय पाटील, सरचिटणीस पदी विवेक पाटील, सहचिटणीसपदी अशुतोष पाटील, खजिनदार पदी संजय कोलकर, तसेच सल्लागार म्हणून तुळशीराम सत्रे, वसंत भगत, निळकंठ भगत, मंदार दोंदे, राम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.



या सर्वसाधारण सभेप्रसंगी नवनिर्वाचित कार्यकारिणीसह नरेश पाटील (शिवकर), रामचंद्र राऊत, संतोष कल्याणकर, नरेश पाटील (मोहो), विजय पवार, प्रकाश फडके उपस्थित होते. तर जितेंद्र भगत, जितेंद्र चोपडे, प्रमोद भिंगारकर, अनिल नलावडे, नितीन भगत, शिवाजी लखंबले आदींनी नवनिर्वाचित कार्यकारणीला शुभेच्छा दिल्या आहेत.

# खारघरमध्ये रंगला श्वानांचा फॅशन शो

**खारघर : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

विविध ठिकाणी फॅशन शो आपण ऐकत असतो. या फॅशन शोमध्ये मानवनिर्मित विविध कपडे, त्यांचे प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती आपण पाहत असतो, मात्र खारघर शहरात शनिवारी (दि. २४) सेंट्रल पार्कमध्ये चक्क श्वानांचा आगळा वेगळा फॅशन शो चर्चेचा विषय ठरला. शहरातील खारघर डॉग पार्क ऑर्गनायझेशनच्या पुढाकाराने हा शो पार पडला.

शहरातील सेंट्रल पार्क हा तब्बल १०० एकरात पसरलेला आहे. विविध प्रकारच्या एक्टिव्हीटी याठिकाणी दररोज होत असतात. याठिकाणाला दररोज शेकडो नागरिक भेट देतात. यापैकीच काही पाळीव प्राणी प्रेमी नागरिक देखील आहेत. या पार्कच्या एका भागाला डॉग पार्क नाव देऊन या नागरिकांनी ख्रिसमस निमित्ताने हा फॅशन शो भरवला होता. या वेळी वेगवेगळ्या प्रजातीच्या कुत्र्यांना सुंदर वेशभूषा परिधान करून त्यांचे फॅशन आयोजित करण्यात आले.

या दरम्यान या पाळीव कुत्र्यांना (श्वानांना) डेनिम, फ्रॉक, सांता क्लॉज, रॉक स्टारची वेशभूषा परिधान करून त्यांचे फॅशन शो याठिकाणी पार पडले. तब्बल ७२ पाळीव कुत्रांचा या शो मध्ये सहभाग होता. खारघर नवी मुंबई परिसरात प्रथमच अशाप्रकारचा फॅशन शो झाला. या आगळा वेगळा फॅशन शो पाहण्यासाठी सेंट्रल पार्कमध्ये उपस्थित असलेल्या नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या शो मध्ये सहभागी झालेल्या पाळीव कुत्र्यांच्या मालकांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. या छोटेखानी कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती आयोजक नुपुरा चव्हाण यांनी दिली.

जे लोक कुत्रा पाळतात ते तो आपल्या घरचा सदस्य असल्याप्रमाणेच त्याची काळजी घेतात. श्वानसुद्धा आपल्या मालकांवर जीवापेक्षाही जास्त प्रेम करतात. अनेक लोक तर आपल्या बाळाप्रमाणे आपल्या पाळीव श्वानांवर प्रेम करतात.याची प्रचिती या कार्यक्रमात आली. या श्वानांच्या सजावटीकडे लहान मुलांप्रमाणे काळजी या श्वानांच्या मालकांनी घेतल्याचे दिसून आले.

### बघणाऱ्यांची गर्दी

**खारघर शहरातील सेंट्रल पार्कात आजवर अनेक सांस्कृतिक कार्यक्रम झाले, मात्र अशाप्रकारे चक्क श्वानांचा फॅशन शो पहिल्यांदाच आयोजित केल्याने सेंट्रल पार्कात मोठ्या प्रमाणात गर्दी या वेगवेगळ्या वेशभूषा परिधान केलेल्या श्वानांना बघण्यासाठी जमली होती.**



# कोपरखैरणे येथे आगरी साहित्य संमेलन उत्साहात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या २२ वर्षांपासून आगरी साहित्य संमेलनाची चळवळ अविरतपणे सुरू आहे. नवे विचार, नवे साहित्यिक आगरी भाषेत निर्माण होत आहेत. त्याची फलश्रुती म्हणजे विद्यापीठ अभासक्रमात आगरी भाषेतील पुस्तकाला स्थान प्राप्त झाले आहे. आगरी बोलीभाषेला आज राजदरबारी ओळख निर्माण झाली असून ही गौरवास्पद बाब असल्याचे प्रतिपादन आगरी साहित्य संमेलनाच्या पहिल्या महिला अध्यक्षा जेष्ठ साहित्यिका दमयंती भोईर यांनी नवी मुंबईत बोलताना केले.

आगरी समाजाच्या १९ व्या आगरी साहित्य संमेलनाचे उद्घाटन जी. पी. पारसिक बँकेचे अध्यक्ष नारायण गावंड यांच्या हस्ते रविवारी (दि. २५) कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्थेच्या महाविद्यालयाच्या प्रांगणात झाले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्ञान विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पी. सी. पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष समाज नेते दशरथ पाटील, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, यांच्यासह डी. डी. घरत, संमेलन कार्यवाह ॲड.प्रसाद पाटील, रवीशेठ पाटील, चंद्रकांत पाटील, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, आगरी साहित्य विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मोहन भोईर, पुंडलिक म्हात्रे, चंद्रकांत मढवी, संदीप पाटील उरणकर, नाट्यकर्मी तथा आगरी कवी रामनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

यावेळी साहित्याच्या पहिल्या सत्रात पारसिक बँकेचे संस्थापक कै. गोपीनाथ पाटील आदर्श व्यक्तिमत्वाचा ठसा या विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षपदी माजी खासदार जगन्नाथ पाटील उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्त्या जयश्री पाटील यांनी संमेलनाध्यक्षा दमयंती भोईर यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. दुपारच्या सत्रात मीनाक्षी तांडेल यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्यातील आगरी महिलांच्या साहित्याचा ठसा या विषयांवर महिलांनी भाषणे केली. सायंकाळी खुले कवी संमेलन झाले. अनेक विषयांवर चर्चासत्र घेण्यात आली.

प्रथम ग्रंथदिंडी काढून साहित्य संमेलनास सुरुवात झाली. कोपरखैरणे परिसरातून विद्यार्थ्यांनी ग्रंथांची पालखी काढली. या वेळी ॲड. पी.सी. पाटील (शिक्षण महर्षी), ह.भ.प. सुनील महाराज रानकर (वारकरी संप्रदाय), ह.भ.प. सोपान महाराज म्हात्रे, पुंडलिक म्हात्रे (आगरी भूषण), प्रकाश तांडेल (क्रीडा भूषण ), दीपक ह. पाटील (आगरी समाज भूषण), देवराम मरोड आणि हरिश्चंद लंगडे (वारकरी संप्रदाय, इगतपुरी, नाशिक) मीनल माळी, सुविधा पाटील तसेच जनार्धन पाटील आदींना आगरी भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.



# रेश्मा कुरुप ठरली मिसेस इंडिया विजेत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नमसुले इंटरटेन्मेन्ट मिसेस इंडिया सुप्रीम वेस्ट झोन ब्युटी कॉन्ट्याक्टचे आयोजन वाशी येथे करण्यात आले होते. नमसुले इंन्टरटेन्टमेन्टच्या ओनर बिंदिया सेन, प्राची माडिया, विनायक भगाडीया, हे स्त्रियाच्या कलागुणाना, वाव मिळण्यासाठी तसेच स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी ब्यूटी कॉन्टेक्टचे आयोजन करतात. या वेळी रसायनीतील रेश्मा सुनील कुरुप यांना मिसेस इंडिया वेस्ट झोन सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच पहिल्या रनरअप घाटकोपरच्या सुनिता चेड्डा ठरल्या.

टायलेन्ट राऊंडमधे रेश्मा कुरुप यांनी एक पात्री अभिनय केला. या कार्यक्रमाचे परिक्षक निलम ताटिया, मिसेस अरथ, रिनू वर्मा ग्लामाटोर, मिसेस महाराष्ट्र, अनूपम चंदन, मिस इंडीया यूनीसव्हर्स उपस्थित होते. रेश्मा सुनील कुरुप या मिसेस इंडिया विजेत्या ठरल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# हिरव्या मिरचीच्या दरात वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न भाजीपाला बाजार समिती हिरवी मिरचीच्या १५ हून अधिक गाड्या दाखल होत होत्या, मात्र आता फक्त १० ते ११ गाड्या आवक होत असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी झाल्याने बाजारात हिरव्या मिरचीच्या दरांत ४० टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात १६ ते २२ रुपये किलोला मिळणारी मिरची प्रतिकिलो २४ ते ४० रुपयांवर गेली आहे.

एपीएमसी बाजारात मार्चमध्ये हिरव्या मिरचीच्या दराने इतिहासात प्रथमच उच्चांक गाठला होता. मार्चमध्ये घाऊक बाजारात मिरचीला प्रति किलो १४० रुपये एवढा भाव मिळाला होता, परंतु, एप्रिल-ऑगस्टमध्ये सर्वच भाज्यांचे दर उतरल्याने हिरव्या मिरचीचे दरही आवाक्यात येण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे हिरवी मिरची ही प्रतिकिलो १६ ते २३ रुपयांनी उपलब्ध होती, परंतु शनिवारी केवळ १० ते ११ गाड्या आवक झाली आहे. तसेच मागील दोन दिवसांपासून हिरव्या मिरचीच्या मागणीतही वाढ झाल्याने दरात ४० टक्क्यांनी वाढ झाल्याचे मत व्यापारी श्रीकांत मोहिते यांनी व्यक्त केले आहे.

एपीएमसी बाजारात महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश येथून हिरवी मिरची दाखल होत असते. सध्या बाजारात दोन हजारांहून अधिक क्विंटल मिरची दाखल होत आहे; मात्र मागणीनुसार पुरवठा कमी होत असल्याने दरवाढ झाली आहे. घाऊक बाजारात दर वधारले असल्याने किरकोळ बाजारातदेखील दरवाढ झाली आहे. शनिवारी बाजारात फक्त दोन हजार २४९ क्विंटल हिरवी मिरची दाखल झाली होती.



# माथेरानच्या ई-रिक्षांवर दगडफेक

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानच्या पर्यटनामध्ये ऐतिहासिक निर्णय ठरलेल्या ई - रिक्षा या सध्या माथेरानमध्ये सुरू आहे, परंतु या रिक्षावर येथील एका अवघड वळणावर काही अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केली होती. अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ई-रिक्षाचालक संजय हरिभाऊ बांगरे यांची रिक्षा (आठ एम एच ४६ बीपी ३६०६) या ई रिक्षा मधून दस्तुरी नाका इथून माथेरानच्या दिशेने पॅसेंजर घेऊन येत असताना कोणी अज्ञात व्यक्तीने आरटूआरफोर या रिक्षातील चालक आणि प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल अशा बेदरकारपणे व हयगयीने ई-रिक्षावर दगड मारण्याची कृती केली होती. या दगडफेकीत सुदैवाने रिक्षाचालक थोडक्यात बचावला, परंतु अशा प्रकारची घटना पुन्हा होऊ नये याकरिता या रिक्षा चालविणाऱ्या कंपनीचे व्यवस्थापक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाची अधिक तपास माथेरान पोलीस ठाण्याचे एपीआय शेखर लव्हे तसेच ठाणे अंमलदार महेंद्र राठोड हे करीत आहेत.

## अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल



**दोन वेळा असे दगडफेकीचे प्रकार घडलेले आहेत. त्या अज्ञात व्यक्तींचा हाच उद्देश असावा की ई रिक्षाच्या चालकांना त्रास दिल्यास आणि जखमी केल्यास हे चालक काम करणार नाहीत. यापुढे अशा दगडफेकीच्या घटना घडू नयेत.**
**-हरिश्चंद्र पारधी, ई-रिक्षाचालक**

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार सध्या प्रायोगिक तत्त्वावर ई - रिक्षा सुरू आहेत. या सेवेमुळे सर्वांना लाभ होत आहे, परंतु काही अज्ञात व्यक्तींनी या रिक्षावर केलेल्या दगडफेकीचा प्रकार अत्यंत निंदनीय असून आम्ही अशा कृतीचा जाहीर निषेध करतो. पोलीस प्रशासनाने लवकरच अशा व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.**
**-शकील पटेल, अध्यक्ष श्रमिक हातरीक्षा संघटना माथेरान**

**मुरूड : होड्यांची गर्दी सध्या समुद्रकिनारी पहावयास मिळत आहे. खोल समुद्रातून मासेमारी करून आल्यावर मच्छीमार काही दिवसांचा आराम करून पुन्हा मच्छिमारीस जात असतात. मासेमारी करून आल्यावर किनाऱ्याला होड्यांची झालेली गर्दी दिसत आहे.**
(छाया : संजय करडे)



# खोपोलीमधील महावीर उद्यानाच्या डागडुजीची मागणी



(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका मालकीचे व शास्त्रीनगर येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या भगवान महावीर उद्यानचे वैभव हरवल्याची स्थिती बनली आहे. उद्यानाच्या नुतनीकरणाची मागणी अनेक संघटना करीत आहेत.

या उद्यानाचे विस्तारीकरण व नूतनीकरण करण्यात आले होते. त्यानंतर दर दोन वर्षांनी या उद्यानावर नगरपालिका कडून जवळपास १२ ते १५ लाख निधी खर्च केला जात आहे. एका बाजूला नियमित खर्च होऊनही उद्यानाची स्थिती मात्र सुधारण्याऐवजी बिघडत आहे. मागील दोन वर्षे कोरोनाचे कारण पुढे करून या उद्यानाच्या देखभाल व डागडुजीकडे दुर्लक्ष झाले आहे. नगरपालिकेकडून सुरू असलेला निष्काळजीपणा व दुर्लक्षमुळे या उद्यानाचे वैभव हरपले आहे.

महावीर उद्यानात बसविण्यात आलेली खेळणी ज्यात मिनी ट्रेन, लहान मुलांसाठीचे विविध खेळणे, पाळणे व अन्य साहित्य सामुग्री बंद पडली आहे किंवा तुटलेल्या अवस्थेत भग्न स्थितीत पडून आहे. येथील हिरवाईला वेळेवर पाणी मिळत नसल्याने हिरवाई सुखलेल्या स्थितीत आहे. लाखो रुपये खर्च करून बसविण्यात आलेले कारंजे व अन्य शोभेचे साहित्य ही दुर्लक्षित बनले आहे. एकेकाळी बच्चे कंपनी व थोरामोठ्यांसाठी प्रमुख केंद्र असलेल्या महावीर उद्यानमधील सोयीसुविधा नष्ट होत आहेत. महावीर उद्यानाची वर्तमान अवस्था बघता या उद्यानाच्या नूतनीकरण व सुशोभीकरणासाठी खर्च करण्यात आलेला लाखोंचा निधी वाया गेल्याची स्थिती आहे.

कोरोना संकट व त्यामुळे निर्माण झालेल्या स्थितीमुळे महावीर उद्यानाचे नुकसान झाल्याचे नगरपालिका प्रशासनाकडून सांगितले जात आहे. येथील महागड्या खेळणी व अन्य साहित्याची झालेली मोडतोड व नुकसान निव्वळ नगरपालिकेकडून झालेल्या दुर्लक्षामुळे झाले असल्याचे स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधीचे म्हणणे आहे.

दरम्यान, महावीर उद्यानाची बनलेली दुरवस्थेमुळे खोपोली जैन संघटना व व्यापारी संघटना ही संतप्त असून लवकरात लवकर या उद्यानाला गत वैभव प्राप्त होण्याची मागणी खोपोली जैन समाज संघटनेकडून नगरपालिकेकडे करण्यात येणार आहे.

# इंग्रजी शिकताना आपल्याला मराठी भाषेचा विसर होता कामा नये -सुरेश मेहता

**महाड, पोलादपूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने महाडमध्ये राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय साहित्य संमेलन रविवारी (दि. २५) महाडमध्ये झाले.

या वेळी बोलताना संमेलनाध्यक्ष सुरेश मेहता यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात इंग्रजी भाषा काळाची गरज असली तरी इंग्रजी अनिवार्य असू नये असे सांगून मराठी भाषेजवळ असलेली आपली नाळ तोडू नये, असे आवाहन केले. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या महाड शाखेकडून राजमाता जिजाऊ साहित्य संम्मेलनाचे आयोजन दशनेमा सभागृह येथे करण्यात आले होते.

या संमेलनाचे उद्घाटन संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांनी केले. या वेळी आमदार भरत गोगावले, संमेलनाचे अध्यक्ष सुरेश मेहता, कोकण प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अलका नाईक, डॉ. अ. ना. रसनकुटे, फुलचंद नागटिळक, स्वागताध्यक्ष मंगल गांधी, सचिव रिचा गांधी, कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, विशाल मोरे आदी उपस्थित होते. राजमाता जिजाऊच्या प्रतिमेचे पूजन आणि पाहुण्यांचे स्वागत करून या साहित्य संमेलनास सुरुवात झाली.



**महाडमध्ये राजमाता जिजाऊ साहित्य संमेलन**

या वेळीसर्वच मान्यवरांनी देशातील समस्या मांडण्याचा प्रयत्न साहित्यातून झाला पाहिजे असे मत व्यक्त करत आज सर्वसामान्य माणूस ज्या प्रकारे जीवन जगत आहे त्याचे वर्णन साहित्यातून अनेकदा येते मात्र त्याला न्याय देण्याचे काम देखील साहित्यातून झाले पाहिजे असे मत सुधीर शेठ, डॉ. अ. ना. रसनकुटे, फुलचंद नागटिळक यांनी मांडले. तर डॉ. अलका नाईक यांनीदेखील साहित्यातून सामान्य माणसाचे प्रश्न लोकांसमोर मांडण्याचे काम साहित्यिकाने केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातदेखील सुरेश मेहता यांनी सद्या नवयुवक साहित्यापासून दूर जात असून त्याला पुन्हा यामध्ये ओढणे हा आपल्यासमोर प्रश्न असल्याचे सांगून इंग्रजी भाषेचा वापर काळाची गरज बनली असली तरी याकरिता मराठी भाषेचा बळी दिला जाऊ नये असे सांगून देशातील शेतकरी, कष्टकरी, मजूर, गरीब, वंचित, शोषित, पिडीत यांसारख्या देशाचा कणा असलेल्या लोकांचा जीवनपट साहित्यातून उमटला गेला पाहिजे, असे मत व्यक्त केले. या वेळी उपस्थित कवींनी आपल्या कविता देखील सादर केल्या. हे संमेलन करण्यासाठी मंगल गांधी, नेत्रा मेहता, संगीता कांबळे, नेहा तलाठी, निलांबरी घोलप, त्रिवेणी मराठे, आदींनी मोलाचे सहकार्य केले.



**अलिबाग : एकवीरा पदयात्रा मंडळ हशिवरे पदयात्रा पालखी हशीवरे ते एकवीरा सोहळ्याला मोठा प्रतिसाद लाभत आहे. विविध मान्यवरांनी या सोहळ्याला शुभेच्छा दिल्या असून या पदयात्रेत व्यवस्थापण उमेश गावंड आणि मंडळी उपस्थित आहेत.** (छाया : महेंद्र म्हात्रे)

# लायन्स क्लब नागोठणेतर्फे प्राथमिक शाळेस गॅस शेगडी भेट

**नागोठणे : प्रतिनिधी**

लायन्स क्लबच्या माध्यमातून राजिप प्राथमिक शाळेतील (कचेरी शाळा) विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी रोहा येथील व शाळेस गॅस शेगडी भेट देण्यात आली.

काही दिवसांपूर्वी क्लबकडून विद्यार्थ्यांना झोन चेअरमन नुरुद्दीन रोहावाला यांच्या उपस्थितीत सहभोजन देण्यात आले. त्यावेळी रोहावाला यांनी शाळेला गॅस शेगडी भेट देण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता नुकतीच क्लबचे अध्यक्ष डॉ. अनिल गीते, सेक्रेटरी विवेक सुभेकर, चार्टर्ड प्रेसिडंट प्रकाश जैन, डिस्ट्रिक्ट चेअरमन यशवंत चित्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना खाऊ व मुख्याध्यापिका संगिता सैंदाणे, शिक्षिका स्वाती पाटील यांच्याकडे गॅस शेगडी सुपूर्त करण्यात आली.



या वेळी डॉ. अनिल गिते यांनी क्लबच्या कार्याची ओळख देऊन हा कार्यक्रम नुरुद्दीन रोहावाला यांच्या माध्यमातुन होत असल्याचे सांगितले. या वेळी यशवंत चित्रे यांनी मुलांची बौद्धीक तपासणी केली व मुलांचे तसेच शाळेतील शिक्षीका मुलांवर खुप मेहनत घेत असल्यामुळे त्यांचेही कौतुक करून आभार मानले. या वेळी क्लबचे संतोष शहासने, सुधाकर जवके, सिद्धेश काळे, दीपक लोणारी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# शेताच्या रक्षणासाठी बुजगावणे सज्ज

**माणगाव : प्रतिनिधी**

रब्बी हंगामातील शेतीला बहर येत आहे. बहरलेल्या शेतामध्ये शेताच्या रक्षणाला उभी असणारी बुजगावणे मोठ्या प्रमाणात सर्वत्र दिसत आहेत.

रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात कडधान्य शेती केली जाते. योग्य हवामानामुळे या कालावधीत कडधान्य शेतीला बहर येत असतो. याच कालावधीत अनेक पक्षांचे स्थलांतर होऊन पक्षी तयार झालेली कडधान्य खाण्यासाठी येत असतात. मुबलक खाण्यामुळे स्थलांतर झालेले हे पक्षी शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात तसेच जंगलातील प्राणी शेतात घुसून नासाडी करतात. या पक्षी व प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पूर्वीपासून शेतकरी बहरणाऱ्या शेतामध्ये रंगीबिरंगी बुजगावणे उभी करून ठेवतात, ज्यायोगे पक्षी,प्राण्यांना शेतात कोणीतरी उभे असल्याचा भास होतो व ते शेतात जात नाहीत.

पूर्वीपासून सुरू असलेली बुजगावणे उभारण्याची ही पद्धती आधुनिक काळातही सुरू असून सध्या शेतामध्ये सर्वत्र ठीक ठिकाणी विविध प्रकारची बुजगावणे उभी केल्याचे दिसत आहेत.

बुजगावणे म्हणजे कापड व तत्सम वस्तू वापरून तयार केलेले पुतळे असतात. शेतात काठीचा आधार घेऊन माणसासारखी प्रतिकृती उभी केली जाते. दोन काठीचे अधिकचे चिन्ह उभे करून त्यावर शर्ट ,पॅन्ट किंवा इतर कपडे वस्तू घातल्या जातात, मुखवटाही तयार केला जातो. फुटकी मडकी किंवा गोलाकार वस्तू वापरून मानवाचा चेहरा केला जातो. चुना किंवा पांढरा रंग वापरून त्यावर डोळे, नाक रेखाटले जातात. चमकणाऱ्या वस्तू पदार्थांचा यासाठी जास्त वापर केला जातो. अलीकडे यंत्राचा वापर करूनही विविध प्रकारचे आवाज निघण्यासाठी बुजगावण्यात रचना केली जाते.गोल फिरणाऱ्या भुतासारख्या दिसणाऱ्या बुजगावण्याची सध्या सर्वत्र क्रेझ असून प्लास्टिक किंवा तत्सम वस्तूंचाही मोठ्या प्रमाणात बुजगावणे तयार करण्यासाठी वापर केला जातो. बुजगावणे हे शेतामध्ये उभे असल्यानंतर अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी हे शेतीचे नुकसान करत नाहीत. रात्रीच्या अंधारात हे बुजगावणे हवेमुळे हालचाल करीत असल्याने पक्षी, प्राण्यांना भीती वाटते तसेच यावर काढलेले चित्र चमकत असल्याने पक्षी प्राण्यांपासून शेतीचे रक्षण होते. नायलॉनचे धागे ,प्लास्टिकच्या पिशव्या या सुद्धा बुजगावणे तयार करण्यासाठी वापरल्या जातात. प्लॅस्टिक पिशवी, धागे हवेमध्ये विशिष्ठ आवाज करतात यामुळे ही पक्षी, प्राणी शेतापासून दूर राहतात.



**शेतात बुजगावणे लावण्याची पद्धत फार पूर्वीपासून आहे.ही बुजगवणी हालचाल करणारी व चमकणारी असल्याने पक्षी, प्राणी घाबरतात. शेतातील कडधान्याचे यामुळे नुकसान कमी होते. जुने कपडे,साहित्य यासाठी वापरले जाते. रात्रीच्या अंधारात बुजगवण्यावरील मडके चमकत असल्याने प्राणी दूर होतात. शेताचे नुकसान टाळण्यासाठी ही उभारली जातात.**
**-तुकाराम पंडव, बुजुर्ग शेतकरी.**

शेतातील कडधान्याचे नुकसान होऊ नये म्हणून पूर्वापार चालत आलेल्या बुजगावणे लावण्याचे आजही आकर्षण असून बहरलेल्या शेताचे रक्षण करणारी बुजगावणी पाहणे मनोरंजक ठरत आहे.

# अमोल गुरव यांना समाजभूषण पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पंढरपूर येथील स्वर्गीय हरिश्चंद्र गायकवाड बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या वतीने चौक तुपगाव येथील अमोल अरुण गुरव यांना एटीएस अधिकारी स्व. नरेंद्र पाटकर राष्ट्रीय स्नेहबंध समाजभुषण पुरस्काराने गौरविण्यात आले. या वेळी पंढरीनाथ कदम, कृष्णांत गायकवाड, शरीफ शेख आदी उपस्थित होते.

अमोल गुरव हे अखिल गुरव समाज संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष आहेत. याअगोदरही गुरव यांच्या कार्याबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.



# रायगड जिल्ह्यात सेवा रथ यात्रा



**मुरूड : प्रतिनिधी**

जनकल्याण समिती रायगड जिल्ह्यातर्फे सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त नऊ तालुक्यांमध्ये रथयात्रेच्या परिक्रमेस २० ते २७ डिसेंबर पर्यंत सेवा रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मुरूड येथे हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात रथ यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले.

या वेळी हिंदू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, सचिव सुनिल विरकुड, सुरेशवर्तक, विनायक रांजणकर, संजय ठाकूर, अस्मिता पेंडसे आदी उपस्थित होते. जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह पुरुषोत्तम कुंटे यांनी सेवा रथयात्रेचे प्रयोजन कथन करतांना सांगितले की, ज्या ज्या वेळी देशावर आपत्ती येते त्या त्या वेळी रा. स्व संघ जनकल्याण समिती तर्फे तन मन धन देऊन मदत केली जाते. संस्कार, आरोग्य, फिरती विज्ञान प्रयोग शाळा, रुग्णोपयोगी साहित्य केंद्र, ग्राम आरोग्य रक्षक प्रकल्प, स्वावलंबन, आपत्ती विमोचन आदी विविध उपक्रमांच्या माध्यमातून सेवा कार्य चालविते.

नागरिकांनी या कार्यात सहभाग नोंदवून या राष्ट्रीय कार्याला हातभार लावण्याचे आवाहन केले. या वेळी जिल्हा कार्यकर्ते ॲड. धनंजय धारप, श्रीपाद गिरधर, निलीमा भांड, दीपा चव्हाण, भाग्यश्री रत्नपारखी आदी उपस्थित होते.

# ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेत हाशिवरे विजयी

## स्पर्धांमधून खेळाडूंना संघटित करण्याचे काम : आमदार रविशेठ पाटील



**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील मैदानावर भव्य दिव्य असे क्रिकेट सामन्यांचे आयोजन करून ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्याचे काम मनसे तालुकाध्यक्ष रुपेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले असून या स्पर्धेतून खेळाडूंना संघटित करण्याचे कामही त्यांनी केले असल्याचे मत आमदार रविशेठ पाटील यांनी मनसे चषक पारितोषिक वितरणाच्या वेळी केले.

मनसे तालुकाध्यक्ष रुपेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर भव्य दिव्य असे ओव्हरआर्म क्रिकेटच्या सामन्यांचे आयोजन तीन दिवस करण्यात आले होते. या स्पर्धेत हाशिवरे संघ अलिबाग या संघाने मनसे चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास हर्षद पितळे, सिनेआर्टिस्ट पारस राठोड, किशोर पाटील, मनसे तालुकाध्यक्ष रुपेश पाटील, महिला शहराध्यक्षा निकिता पाटील, पेण तालुका फोर्टी प्लसचे अध्यक्ष सतीश पाटील आदींसह क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

या वेळी बोलताना रविशेठ पाटील यांनी, मनसे चषक माध्यमातून क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आल्या. या स्पर्धेत पेण तालुक्यासह इतरही तालुक्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे नियोजन व आयोजनाने भारावून गेलो असल्याचे सांगत रुपेश पाटील यांना पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत हाशिवरे संघाने कालभैरव कोपर संघाला नमवित एक लाख एक हजार १११ रुपये व मनसे चषक पटकाविले. द्वितीय क्रमांक कालभैरव कोपर संघ व तृतीय क्रमांक मोरया इलेव्हन संघ बोरगाव या संघाने बक्षीस पटकाविले, तसेच उत्कृष्ट फलंदाज मनिष मोकल (हाशिवरे संघ, अलिबाग), उत्कृष्ट गोलंदाज मंथन डाकी (हाशिवरे संघ, अलिबाग), उत्कृष्ट क्षेत्ररक्षण अविनाश ठाकूर ( कालभैरव कोपर संघ), मालिकावीर म्हणून हाशिवरे संघाचा प्रफुल्ल पाटील यांना गौरविण्यात आले, तसेच प्रेक्षकांसाठी ठेवण्यात आलेला लकी ड्रॉ रुपेश पाटील यांची कन्या रुई पाटील हिच्या हस्ते काढण्यात आले. या वेळी अक्षय पाटील खारसापोली बेडे याने पटकावले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हिरामण जेधे, ओमकार कचरे, सौरभ पाटील, माधुरी काठवले आदींसह कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# आर्या बोरसेला नेमबाजीत सलग दुसरे सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील लक्ष्य शुटिंग क्लबच्या परिसरात पार पडलेल्या आरआर लक्ष्य नेमबाजी स्पर्धेमध्ये नाशिकच्या आर्या बोरसे हिने सलग दुसऱ्या वर्षी ज्युनियर गटात सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. वरिष्ठ गटामध्ये ओडिशाच्या श्रीयांका सदांगी हिने बाजी मारली.

ज्युनियर गटाच्या सुवर्णपदकासाठीच्या लढतीत आर्या बोरसे व पार्थ माने या दोन महाराष्ट्राच्या खेळाडूंमध्ये टक्कर पाहायला मिळाली, मात्र या लढतीत आर्याने दबावाखाली अचूक वेध साधला. त्यामुळे पार्थचा १७-४ असा पराभव झाला. मध्य प्रदेशची चौकसी हिने ब्राँझपदक पटकावले.

या स्पर्धेमध्ये दोन वेगवेगळ्या गटांमध्ये स्पर्धक सहभागी होत नाहीत. लक्ष्य नेमबाजी स्पर्धेमध्ये पुरुष व महिला एकत्रितपणे सहभागी होतात. यंदा वरिष्ठ गटामध्ये ओडिशाच्या श्रीयांका सदांगी हिने विजेता होण्याचा मान संपादन केला. याआधी २०१६ मध्ये महिला खेळाडूने वरिष्ठ गटात विजेता होण्याचा मान संपादन केला होता. कर्नाटकच्या मेघना सज्जनर हिने २०१६मध्ये श्रीयांकाला हरवून स्पर्धा जिंकली होती.

# धनश्री कंक, प्राची वांगडे यांना खो-खो फेडरेशनची शिष्यवृत्ती जाहीर



**नवी मुंबई : बातमीदार**

फलटण येथे झालेल्या किशोर/किशोर राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील गुणी आणि होतकरू खेळाडूंसाठी खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाने शिष्यवृत्ती देण्यात येईल, असे स्पर्धेदरम्यान जाहीर केले होते. त्यानुसार प्रत्यक्ष मैदानातील कामगिरीच्या आधारे त्यांनी सुवर्णपदक विजेत्या महाराष्ट्राच्या किशोरी संघातील सहा खेळाडूंना शिष्यवृत्ती जाहीर केली. त्यात नवी मुंबईतील ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनच्या खेळाडू धनश्री कंक आणि प्राची वांगडे यांची निवड करण्यात आली आहे.

शिष्यवृत्ती मिळवणारे धनश्री आणि प्राची हे खेळाडू विनायक मनसुख, लोकेश निकाळे तसेच निलेश चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनच्या मैदानावर सराव करीत असतात. त्यांच्या निवडीबद्दल ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष प्रसाद पाटील, सचिव चंद्रकांत पाटील तसेच खजिनदार विद्यानंद पाटील आणि सर्व पदाधिकारी यांनी धनश्री आणि प्राचीचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

छावा शिवकालीन बहुउद्देशीय कलामंच यांच्या वतीने नववी राज्यस्तरीय कराटे, काता व लाठी काठी चॅम्पियनशिप स्पर्धा अमित गडअंकुश यांनी आयोजित केली होती.

या स्पर्धेमध्ये जवळपास ४५०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये इंडियन मार्शल आर्ट्स शितोरियो फेडरेशन अध्यक्ष प्रवीण पाटील, सचिव सुनील पाटील, जितेंद्र गायकर, स्वप्निल भोईर, गोरक्षनाथ पाटील, उपाध्यक्ष व प्रशिक्षक शैलेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आकांक्षा ठोकळे, साहिल खान, प्रेम चव्हाण, रुद्रा पाटील अशा



चौघांना सुवर्णपदक, दिव्या पाटील, रिताशा सुर्वे, पियुष धायगुडे, श्रुतिका सोनवले, प्रबगुन उप्पल असे पाच रौप्यपदक, आणि अभिषेक सिंग, सानिका ठाकुर, मानसी गोरे, अवंतिका कदम, अनुज नलवडे, अनघा नलवडे, सोहेल खान, प्रियांका रस्कोती असे नऊ कांस्यपदक मिळविल्यामुळे विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे कौतुक करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेला द्वितीय क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी मिळाली आहे.

# तायक्वांडो स्पर्धेत पवित्रा कदमला सुवर्ण

**खालापूर : प्रतिनिधी**

पनवेल येथे जिल्हास्तरीय तायक्वांडो स्पर्धेत खालापूरच्या पवित्रा कदम हिने सुवर्णपदकाची कमाई केली आहे. आतापर्यंत तिने जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये पाच सुवर्णपदके मिळविली आहेत.

पवित्रा हिची रायगड जिल्ह्यामधून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पवित्रा कदम खालापूर तालुक्यातील वावंढळ येथील रहिवासी असून रिलायन्स फाउंडेशन स्कूल लोधीवली येथे शिक्षण घेत आहे. सरनोबत नेताजी पालकर तायक्वांडो क्लासेसचे मुख्य प्रशिक्षक अलंकार आपटेकर, मुख्य कोच सुभाष पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# राष्ट्रीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशीपमध्ये नवी मुंबईच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बेंगळुरु येथे ६०व्या राष्ट्रीय स्केटिंग चॅम्पियनशीपचे आयोजन भारतीय रोलर स्केटिंग महासंघाच्या वतीने १० ते १६ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले. यात नवी मुंबईच्या खेळाडूंनी निर्विवाद वर्चस्व गाजवत एकूण तीन पदकांची कमाई केली.

या स्पर्धेत देशातील १४८पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करताना नवी मुंबईच्या आठ खेळाडूंपैकी अहिल पीर खान रौप्यपदक आणि निशांत अरथीया व श्रुती भोसले कास्यपदक अशा तीन पदकांची कमाई करत आपला दबदबा राखला. पदक विजेते खेळाडू स्पर्धेत स्केटबोर्डिंग आणि स्कुटर प्रकारात पदके जिंकत अव्वल ठरली.

पदक विजेत्या खेळाडूंना प्रशिक्षक सागर घरत, श्रुती भोसले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पदक विजेत्या खेळाडूंचे पी. के. सिंग, आशुतोष जगताप यांनी अभिनंदन केले. राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय कामगिरी बजावल्याबद्दल नवी मुंबईकरांच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# अश्विन ठरला जगातील दुसरा वेगवान अष्टपैलू खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेश विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने आश्विनच्या शानदार खेळीच्या जोरावर विजय मिळवला. भारताने दुसऱ्या सामन्यात तीन विकेट्सने विजय मिळवताना, मालिका २-० ने आपल्या नावावर केली. या सामन्यात अश्विनने आपल्या ४२ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर त्याने कसोटी कारकिर्दीत ३००० धावाही पूर्ण केल्या. हे करीत त्याने एक खास विक्रम आपल्या नावावर केला आहे.




बांगलादेशविरुद्ध अश्विनने ६२ चेंडूत एक षटकार आणि चार चौकारांसह ४२ धावांची नाबाद खेळी साकारली. अश्विनने श्रेयस अय्यरसोबत आठव्या विकेटसाठी नाबाद ७१ धावांची भागीदारी केली. ज्यामुळे सामन्याचे चित्र पालटले. अय्यर २९ धावा करून नाबाद राहिला. अश्विनने आपल्या कसोटी कारकिर्दीत ४२ धावांच्या खेळीत ३००० धावाही पूर्ण केल्या. त्याचबरोबर त्याने तीन दिग्गज खेळाडूंचे विक्रम मोडीत काढले. कसोटी क्रिकेटमध्ये ३००० धावा आणि ४०० बळींचा दुहेरी धमाका करणारा, अश्विन जगातील दुसरा सर्वात वेगवान अष्टपैलू खेळाडू बनला आहे. अश्विनने कसोटीत ८८ सामन्यांमध्ये ३००० धावा पूर्ण केल्या आहेत. ८८ कसोटी सामन्यांपर्यंत अश्विनच्या कसोटीत ३०४३ धावा आणि ४४९ विकेट्स आहेत. या प्रकरणात, रिचर्ड हॅडली हा कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद ३००० आणि ४०० बळींचा टप्पा गाठणारा खेळाडू ठरला आहे. आपल्या ८६ व्या सामन्यात हा दुहेरी धडाका पूर्ण करण्यात तो यशस्वी ठरला.

आता अश्विनने शेन वॉर्न, स्टुअर्ट ब्रॉड, कपिल देव, शॉन पोलॉक यांना मागे टाकले आहे. शेन वॉर्नला ३००० धावा आणि ४०० बळींचा दुहेरी धमाका गाठण्यासाठी १४२ कसोटी सामने खेळावे लागले. इंग्लंडच्या ब्रॉडने १२१ कसोटी सामने खेळले, तर कपिल देवने ११५ कसोटी सामने खेळले. दक्षिण आफ्रिकेच्या शॉन पोलॉकने १०८ कसोटी सामने खेळले.

# जम्पिंग शो घोडेस्वारीच्या स्पर्धेत माथेरानच्या किरण आखाडेचे यश



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

भोपाळ येथे ज्युनियर राष्ट्रीय जम्पिंग शो घोडेस्वारी स्पर्धा इक्वेस्टएरियन फेडरेशन ऑफ इंडियाने नुकतीच आयोजित केली होती. या स्पर्धेत देशभरातून ३४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धेत माथेरानच्या किरण आखाडे यांनी दोन वेगळ्या स्पर्धेत द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. किरण बेंगलोरच्या युनायटेड क्लबकडून स्पर्धेत सहभागी झाला होता.

माथेरान हे घोड्यांचे माहेरघर आहे. या गावातून स्थानिक त्याचप्रमाणे परिसरातून येऊन इथे स्थायिक झालेले जागतिक कीर्तीचे अनेक घोडेस्वार याच माथेरानच्या भूमीत निर्माण झाले आहेत. किरण आखाडे याने घोडेस्वारीचे कौशल्य माथेरान येथे आत्मसात केलेले असून बँगलोर क्लबमध्ये घोडे जम्पिंग शोचे कौशल्य शिकला आहे. मागील काळात माथेरानमधील अनेक मुलांनी विविध क्षेत्रात राज्यपातळीवर तसेच परदेशात जाऊन आपले करियर निर्माण केलेले आहे. शैक्षणिक क्षेत्र असो किंवा क्रीडा स्पर्धा असोत त्यातच घोडेस्वारीमध्येही अनेक जणांनी आपला ठसा उमटवला आहे. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी किरण आखाडेने जम्पिंग शोमध्ये नेत्रदीपक कामगिरी केली असल्याने त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# क्रिकेट ऑस्ट्रेलियाने केला कसोटी पुरस्काराच्या नावात बदल

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात बॉक्सिंग डे कसोटी खेळली जात आहे, पण या कसोटीदरम्यान क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एक मोठा निर्णय घेतला आहे. हा निर्णय ऑस्ट्रेलियातील कसोटी क्रिकेटमध्ये दिल्या जाणाऱ्या एका मोठ्या पुरस्काराबाबत आहे, ज्याचे नाव आता बदलून शेन वॉर्न करण्यात आले आहे.

शेन वॉर्नच्या मृत्यूनंतर मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर खेळली जाणारी ही पहिलीच कसोटी आहे. त्याच्या सन्मानार्थ क्रिकेट ऑस्ट्रेलियाने टेस्ट प्लेयर ऑफ द इयरचा पुरस्कार शेन वॉर्नच्या नावावर ठेवला आहे. ट्रॅव्हिस हेड हा पुरस्कार जिंकणारा शेवटचा ऑस्ट्रेलियन खेळाडू आहे, तर उस्मान ख्वाजा, मार्नस लॅबुशेन आणि नॅथन लियॉन हे पुढील वर्षी म्हणजे २०२३मध्ये या पुरस्काराचे प्रमुख दावेदार आहेत.

लाबुशेन हा ऑस्ट्रेलियाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने आठ कसोटी सामन्यांमध्ये ६९.७५च्या उत्कृष्ट सरासरीने ८३७ धावा केल्या. त्याच्या काही पावले मागे उस्मान ख्वाजा आहे, ज्याने या कालावधीत ६८.६६च्या सरासरीने ८२४ धावा केल्या आहेत. दुसरीकडे, नॅथन लियॉनने गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक ३९ विकेट्स घेतल्या आहेत, त्यानंतर मिचेल स्टार्क आणि कर्णधार पॅट कमिन्सने अनुक्रमे २७ आणि २४ विकेट्स घेतल्या आहेत. या वेळी ऑस्ट्रेलियन क्रिकेट पुरस्कारांची घोषणा ३० जानेवारीला होणार आहे.

### आशियाई कनिष्ठ तिरंदाजी स्पर्धा

# भारतीय तिरंदाजांची १० पदकांवर मोहोर

**शारजाह : वृत्तसंस्था**

येथे झालेल्या आशियाई कनिष्ठ तिरंदाजी स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी १० पदक जिंकत पदकतालिकेत सर्वांत वरचे स्थान पटकावले आहे. भारतीयांनी बलाढ्य अशा तैवान आणि कोरियाच्या संघाला मागे टाकत पदकतालिकेत १० पदकांसह अव्वल स्थान पटकावले आहे. भारताने पाच सुवर्ण, तीन रौप्य, तर दोन ब्राँझ पदकांवर आपले नाव कोरले आहे.



भारतीयांनी सर्वांत जास्त पदके कंपाऊंड विभागात मिळवली असून या प्रकारात आठपैकी सात पदकांवर भारतीयांनी नाव कोरले आहे. महिलांच्या कंपाऊंड प्रकारात भारताने निर्भेळ यश प्राप्त केले आहे. कंपाऊंड प्रकारात पुरुष आणि महिलांच्या संघाने कोरियाचा पराभव करीत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. कंपाऊंड प्रकारात महिलांच्या एकेरीमध्ये प्रगती, अदिती स्वामी आणि परनीत कौर यांनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके जिंकली. प्रियांश, ओजस देवतळे यांनी पुरुषांच्या कंपाऊंडमध्ये अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदके जिंकली. मिश्र प्रकारात भारताकडून निराशा झाली.

**कंपाउंड प्रकारातील पदकविजेते**

1. एकेरी (महिला) : प्रगती-सुवर्णपदक, आदिती-रौप्यपदक प्रणीत-कांस्यपदक
2. एकेरी (पुरुष) : प्रियांश-सुवर्णपदक, ओजस-रौप्यपदक
3. रिकर्व्ह प्रकार : पुरुष संघ सुवर्णपदक, मिश्र संघ रौप्यपदक
4. एकेरी रिकर्व्ह : पार्थ साळुंखे कांस्यपदक

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com